

दानशूर कै. भिकुलालजी नबीरा

# प्राजक्त

सन २०१६-१७

NAAC'S B Accredited College

स्थापना १९६१

शिक्षण प्रसारक मंडळ काटोल द्वारा संचालित

## नबीरा महाविद्यालय, काटोल



# President's Message

It is indeed a matter of great delight for me to note that Nabira Mahavidyalaya, Katol is bringing out the college annual magazine, Prajakta. I know that our students are not writers of great literary worth. However , it is highly satisfying to see that they attempt to write something. They have tried their hands at writing essays, stories and even poems. The very effort in itself is laudable and praiseworthy. This, I am sure, will inspire and motivate at least some of them to make writing their serious vocation at a later stage. Who knows that some of them may shine as excellent writers in future.

I myself sometimes feel envious of those doctors who are very good writers apart from being good doctors. I wish 1 had that gift. I sincerely feel that our students are encouraged to develop the skill of writing.

I congratulate the members on the Editorial Board for creating a space for the creative talent of the students. 1 wish the magazine a great success.

**Dr. Raju Deshmukh**
President
Shikshan Prasarak Mandal, Katol



# Principal's Message

Dear student friends,

It is a matter of great joy that our college is bringing out the annual magazine, Prajakta incorporating your essays, poems, stories as well as reports of your active participation in various academic, cultural and sports activities. Besides, your keen participation in NCC, NSS, Lok Sankhya Shikshan, Women's Study and Service Centre has been outstanding and deserves great commendation. The magazine reflects your literary as well as histrionic talent. Students of our college have scaled great heights in the past occupying honourable positions in the society. The past history must inspire and motivate you to carve a niche for yourselves so that posterity will remember you and hold you as role models.

Best wishes to all of you.

**Dr. R.S. Satokar**
Principal



# Editorial



**Remembrance**

Fluffy clouds
Rolled by
And waning sun
Glimmered through
Swirling waters under the bridge,
While a sad song
As if from nowhere
Brought in its train
Some sweet
And some sour
Thoughts and emotions
Accompanied by a host of associations
Of the days
Slipped stealthily
Melted unknown, unseen
But lying etched deep in memory
Still fresh, still green.

Dear students,

Each day has its beginning and its end. The whole day we remain busy in doing one thing or the other. At the end of the day we find satisfaction having engaged ourselves in meaningful activities and dissatisfaction if we have wasted it either sitting idle or engaging ourselves in silly and trivial acts. In the first case, we reap joy and in the second we are filled with remorse. It is always better to engage ourselves in activities which bring us joy and a sense of fulfillment. If this is cultivated as a habit, we can contribute something to the society and we will be very proud of ourselves. This has been true with great men and women who have carved a niche for themselves and steered the society on the path of glory.

It gives us immense pleasure to bring out the present issue of Prajakta which comprises stories, essays, poems written by fledgling writers of the college and reports of various departments including cultural activities.

We wish to record invaluable cooperation from all faculty members. We also gratefully acknowledge our thanks to the Principal, Dr. R.S. Satokar and Hon'ble President, Dr. Raju Deshmukh along with all honourable members on the Governing Body.

We wish to thank Shri Raju Khorgade for successfully bringing out the magazine in such a beautiful type set and attractive form.

Editors of this issue do not necessarily subscribe to views published in the articles.

**Dr. Sunil Kumar Navin**
**Dr. R. R. Pathak**

# Members of S.P.M. & L.M.C.



**Dr. Rajuji Deshmukh**
President, S.P.M. & L.M.C.



**Shri Niranjanji Raut**
Vice President S.P.M.
President Jr. College Committee
Invited member, L.M.C.



**Shri Bansilalji Nabira**
Secretary S.P.M.
& Member L.M.C.



**Shri Yogeshji V. Pande**
Joint Secretary S.P.M.
& Member L.M.C.



**Dr. Govindji V. Bhutada**
Member S.P.M.



**Sau. Kundatai Vijaykar**
Member S.P.M.



**Shri Satyendraji T. Khona**
Member S.P.M.



**Shri Ramchandraji Mishra**
Member S.P.M.



**Shri Ramanlalji Nabira**
Member S.P.M.



**Shri Prakashji K. Chandak**
Member S.P.M.& L.M.C.



**Shri Purushottamji Mankar**
Member S.P.M.



**Shri Jawaharlalji Chandak**
Member S.P.M.



**Shri Sureshbabu Harjal**
Member S.P.M.



**Shri Mehmoodji Ahmadaliji Khoja**
Member S.P.M.



**Shri Rajuji Bisani**
Member S.P.M.



**Adv. Deepakji Kene**
Member S.P.M.



**Shri Madanji S. Nabira**
Member L.M.C.



**Shri Pramodji Nabira**
Member L.M.C.



**Dr. S.A. Sonegaonkar**
(Teachers' Representative)



**Dr. Prakash Yawalkar**
(Teachers' Representative)



**Shri P.K. Tiwari**
(Teachers' Representative)



**Shri Devidas N. Walke**
(Non-Teaching Representative)



**Dr. R.S. Satokar**
Principal &
Secretary L.M.C.



NAGPUR UNIVERSITY COLOUR HOLDERS - 2016-17



R.T.M. Nagpur University
Ball Badminton (Women)
Third time Winner Team
2016-17

R.T.M. Nagpur University
Yogasan (Women) Team
Seventh time Winner &
(Men) Team
Seventh time Runner
2016-17





R.T.M. Nagpur University Cross Country (Women)
Second time Runner Team 2016-17



R.T.M. Nagpur University Cross Country (Men)
Third time Third Place Winner Team 2016-17



R.T.M. Nagpur University Koh-Kho (Women)
Second Place Winner Team 2016-17



Nagpur University (M/W) selected Yogasan Team
for Coaching Camp



Dr. Vedprakash Mishra & Dr. Raju Deshmukh inaugurated
New Building Dept. of Physical Education & Sport



Inter College Kabaddi Women Tournament
Shri Niranjanji Raut getting introduced
to the team at college ground



Blood donation camp organized by N.C.C. Deptt.



Republic Day Parade observation by Dr. Raju Deshmukh



संविधान दिवस समारोहात शपथ देतांना
जाधव सर आणि स्वयंसेवक



संविधान दिवस समारोहात मार्गदर्शन करतांना
डॉ. धोटे सर



साफसफाई व वृक्षारोपण करतांना करतांना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक




धनवटे नॅशनल कॉलेज येथे आयोजित आंतर महाविद्यालयीन
वादविवाद व वकृत्व स्पर्धेत सहभागी विद्यार्थी



सांस्कृतिक मंडळाद्वारे आयोजित रांगोळी स्पर्धेचे
परिक्षण करतांना परिक्षक



सांस्कृतिक मंडळाद्वारे आयोजित मेहंदी स्पर्धेत सहभागी विद्यार्थीनी



लोकसंख्या शिक्षण मंडळा अंतर्गत स्वच्छ भारत अभियानात
सहभागी विद्यार्थी



वित्तीय साक्षरता अभियानात मार्गदर्शन करतांना HDFC बँकेचे प्रबंधक श्री पंकज खामलकर आणि डॉ. सोनेगांवकर



विदर्भ स्तरीय चौथे अधिवेशनात जावेद अंसारी यांच्या सत्कार समारंभातील एक क्षण



अतिथी डॉ. सुरु जिचकार यांचे स्वागत करतांना प्राचार्य डॉ. राजीव सातोकर



इतिहास विभाग अतिथी व्याख्यान



स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाबाई जयंती कार्यक्रम



B.B.A. day Celebration



महिला तक्रार समिती तर्फे आयोजित कार्यक्रमात ॲड. रंजना सावल व्याख्यान देतांना




मराठी विभागा तर्फे आयोजित कार्यक्रमात डॉ. अनिल गवळी
'काव्य निर्मिती प्रक्रिया व काव्यवाचन' यावर मार्गदर्शन करतांना



मराठी विभागातर्फे आयोजित शुद्धलेखन
स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी



मराठी विभागातर्फे आयोजित वादविवाद
स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी




मराठी विभागा तर्फे आयोजित कवी संम्मेलनात सहभागी विद्यार्थी



मातृभाषेचे समाज जीवनातील स्थान या विषयावर
मार्गदर्शन करतांना डॉ. रेखा घाटोळे



इतिहास विभाग ऐतिहासिक सहल - श्री क्षेत्र आळंदी

## महाविद्यालय दिवस समारोहातील क्षणचित्रे











दि. २१ जाने. २०१६ ला आचार्य बालकृष्ण महाराज यांना महाविद्यालयाच्या योग भवनाची माहिती देतांना डॉ. तेजसिंह जगदळे, आमदार डॉ. आशिष देशमुख व इतर




महाविद्यालयातील एन.सी.सी. कॅडेट भीम ॲप बद्दल विद्यार्थ्यांना माहिती देतांना



न.म.वि. एन.सी.सी. विभाग व सामाजिक वनिकरण अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने काटोल दिग्रस रोडवर वृक्षारोपन करतांना



**Educational Tour organized by Deptt. of Microbiology & Biotechnology**

# अनुक्रमणिका

## मराठी विभाग


| | लेख | लेखक | वर्ग | पान क्र. |
|---|---|---|---|---|
| १. | युवाशक्ती हीच महाशक्ती | कु. संजीवनी ढोरे | एम.ए. २ | १ |
| २. | स्त्रीयांचे मानवाधिकारी व भारतीय कायदे | मोहम्मद शरीफ खाँन | एम. कॉम. १ | २ |
| ३. | आई | कु. डिना धुर्वे | बी.ए. ३ | ४ |
| ४. | राष्ट्रमाता जिजाऊ | कु. रेणुका बाभुळकर | एम.ए. २ | ५ |
| ५. | सावित्रीबाई भू लोकावर अवतरल्या तर | कु. रश्मी मोहोड | बी.ए. ३ | ६ |
| ६. | आनंद | कु. प्रिया सांबारे | | ७ |
| ७. | स्वच्छतेकडून समृद्धीकडे | कु. मनिषा गायधने | बी.कॉम.३ | ८ |
| ८. | प्रश्न प्रसारमाध्यमांचा... | विक्की गजभिये | बी.ए. ३ | १० |
| ९. | मैत्री | कु. पूजा नारनवरे | बी.ए. १ | १२ |
| १०. | भारतीय राष्ट्रवाद | कु. नैना बैस | बी.ए.३ | १४ |
| ११. | संघर्ष | कु. पायल ठाकरे | बी.कॉम. ३ | १५ |
| १२. | स्त्री पुरुष समानता काळाची गरज | कु. डिना धुर्वे | बी.ए. ३ | १६ |
| १३. | माझा अपराध काय ? | कु. डिम्पल रक्षीत | बी.ए. ३ | १८ |
| १४. | पहिला स्वातंत्र्य संग्राम | कु. प्रियंका गायकवाड | एम.ए. २ | १९ |
| १५. | आता तरी जागे व्हा. | कु. भुमी चौरे | बी.कॉम.२ | २० |
| १६. | भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम | कु. भावना चाफेकर | एम.ए. २ | २१ |

| | कविता | कवी | वर्ग | पान क्र. |
|---|---|---|---|---|
| १. | आई होती म्हणून | कु. श्रद्धा बोंडे | बी.कॉम. २ | २२ |
| २. | माझे बाबा | कु. जया कोल्हे | बी.कॉम. २ | २२ |
| ३. | एकदा | निखील कडू | एम.कॉम. २ | २३ |
| ४. | स्वाभिमान | कु. अक्षता खरबडे | बी.कॉम. १ | २३ |
| ५. | मी शेतात राबतो आहे | कु. शितल गाडरे | बी.बी.ए. १ | २४ |
| ६. | कथा तिच्या जीवनाची | कु. डिंपल गजभिये | बी.ए २ | २४ |
| ७. | मनात नसतांना | कु. संजीवनी ढोरे | एम.ए. २ | २५ |
| ८. | मैत्री | कु. माधुरी वाघाडे | बी.ए. २ | २५ |
| ९. | आठवण | कु. मनिषा गायधने | बी.कॉम. २ | २६ |
| १०. | मला सांगताच आले नाही | कु. सोनल सकर्डे | बी.ए. ३ | २६ |
| ११. | निसर्ग | श्री रामलाल गायते | बी.एससी. १ | २७ |
| १२. | माणसा | कु. रोशनी नासरे | बी.कॉम. २ | २७ |
| १३. | बाप | कु. तेजस्वीनी काठोले | बी.बी.ए. १ | २८ |
| १४. | जीवन | कु. स्वाती शेंडे | बी.कॉम. २ | २८ |
| १५. | सॉरी | कु. रेणुका बाभुळकर | एम.ए. २ | २९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६. | आठवण | किरण कमाले | बी.एससी. ३ | ३० |
| १७. | मैत्री | कु. ज्योती देवतळे | बी.ए. ३ | ३० |
| १८. | धैर्य | कु. प्राची चुटके | एम.ए. २ | ३१ |
| १९. | माझे प्रिय बाबा | चंचल कुटे | बी.ए. १ | ३१ |
| २०. | धैर्य | कु. करिश्मा खापरे | बी.ए. १ | ३२ |
| २१. | आठवणीचे थवे | कु. हर्षा बोंदरे | बी.कॉम. २ | ३२ |
| २२. | मार्ग शिखर प्रगतीचा | कु. नैना बैस | बी.ए. ३ | ३३ |
| २३. | डोळ्यातील आसवांना | कु. संजिवनी ढोरे | एम.ए. २ | ३३ |
| २४. | हेच वय आहे | श्री शुभम थोटे | बी.ए. १ | ३४ |
| २५. | तुझ्यासाठी | कु. प्राची आगे | एम.ए. २ | ३४ |

**हिंदी विभाग**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | आखिर क्यों? लड़की की व्यथा | कु. प्रतिक्षा रंगारी | बी.ए. २ | ३५ |
| | **कविता** | **कवी** | **वर्ग** | **पान क्र.** |
| १. | सावन | श्री ताराचंद पेरोडीया | बी.कॉम. २ | ३६ |
| २. | तेरे बिना | कु. संजिवनी ढोरे | एम.ए. २ | ३६ |

**इंग्रजी विभाग**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | Love Thought | Ku. Shubhangi Yede | B.A. II | 37 |
| 2. | Crime against Women | Ku. Priya Doble | B.A. II | 37 |
| 3. | What is Education | Shri Sachin Deshmukh | B.A. III | 38 |
| 4. | Teenage | Ku. Sneha Sawadh | B.Com. II | 38 |
| 5. | Our India | Ku. Sneha Sawadh | B.Com. II | 39 |

**वार्षिक अहवाल**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | क्रिडा विभाग | प्रा. डॉ. टी.एल. जगदळे | ४० |
| २. | सांस्कृतिक मंडळ | डॉ. व्ही.आर. रुईकर | ४५ |
| ३. | लोकसंख्या शिक्षण मंडळ | डॉ. व्ही.आर. रुईकर | ४७ |
| ४. | राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) | लेफ्टनंट डॉ. तेजसिंह एल. जगदळे | ४८ |
| ५. | राष्ट्रीय सेवा योजना | प्रा. डॉ. आर.जी गोंगले | ५० |
| ६. | महिला अध्ययन व सेवा केंद्र | प्रा. कु. डी.डी. घागरगुंडे | ५२ |
| ७. | मराठी विभाग | प्रा. डॉ. आर.बी. घाटोळे | ५३ |
| ८. | वित्तीय साक्षरता अभियान | डॉ. एस.ए. सोनेगांवकर | ५४ |
| ९. | महाविद्यालय दिवस समारोह | प्रा. डॉ. पुनित राऊत, प्रा मुकेश जाधव | ५५ |
| १०. | बी.बी.ए. विभाग | प्रा. जे.एम. पाटील | ५६ |
| ११. | मायक्रोबॉयलॉजी विभाग | डॉ. एन.बी. हिरुलकर | ५८ |

# युवाशक्ती हीच महाशक्ती

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत सर्वच स्तरांतील लोकांचे जीवन गतीमान झालेले आहे. जीवनात आलेल्या या गतीमुळे आपली स्थिती थांबल्यासारखी झाली आहे. ज्ञानार्जन करु पाहणाऱ्या तरुणांची स्थिती ही याहून वेगळी नाही. अशा स्थितीत मनाला स्थैर्य देऊन आपल्या प्रगतीला सहाय्यक ठरणाऱ्या विचारांची निस्सिम गरज आहे. अशावेळी 'फियरलेस मंच' म्हणजेच स्वामी विवेकांनद यांचे विचार आपल्याला मदत करतात व नवीन चैतन्य ही देतात. तरुणाईत प्रचंड विश्वास असल्यामुळे ते नेहमी सांगत की सकारात्मक विचारांमध्ये सामर्थ्य असते व त्यामुळे जीवनाचे नंदनवन होऊ शकते. परंतु केवळ सकारात्मक विचार उपयोगाचे नसून, माणसाला आपल्या ध्येयाची निश्चितीही करता आली पाहिजे. स्वामी विवेकानंद म्हणतात की, 'उठा जागे व्हा आणि आपले ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका एखादे ध्येय निश्चित केलेला मनुष्य दहा हजार चुका करतो' तात्पर्य असे की ध्येयामुळे आपल्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो, परंतु असे असले तरी ध्येयाची निवड देखील महत्वाची बाब असते.

स्वामीजी असे पहिले संन्यासी होते की ज्यांनी आपल्याला वैयक्तिक मोक्ष मिळावा म्हणून ध्यानसाधना केली नाही. भारत देशाला सर्व शक्तीमान बनविण्यासाठी ते धडपडले. भारताला पुन्हा त्यचे गतवैभव कसे मिळवता येईल हा त्यांच्या ध्यानाचा केंद्रबिंदू होता. भारताला बलशाही करण्याच्या कार्यात आपला सिंहाचा वाटा उचलणे हेच आपल्या समोरचे सर्वोच्च ध्येय असले पाहिजे. तुम्ही विद्यार्थी असा की शिक्षक, शिपाई असा की सैनिक तुम्ही कोणाही असा, आपले सर्वोच्च ध्येय भारत पुनरुत्थानाच्या कार्यात योगदान हेच असू द्या. स्वामी विवेकानंदांच्या शब्दात सांगायचे तर, ''आगामी काळात हे राष्ट्र हेच तुमचे दैवत असू द्या. एकदा ध्येय ठरले की, कार्य करण्याची दिशा आपोआप गवसून जाईल.''

भविष्याचा वेध स्वामीजींनी आधीच घेतला होता म्हणूनच तरुणांना संघटित करण्याचा मंत्र स्वामीजींनी दिला आहे. संघटित कार्यात सहभागी झाल्याने आपला व्यक्तिविकास आणि समाज विकासाची प्रक्रिया ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. यासाठी शक्तीदाई विचारांची सोबत आवश्यक असते हे लक्षात ठेवून आपण सर्व तरुणांनी अशी सेवा केली पाहिजे की, त्याचा आदर्श ठेवून नवीन पिढीने तन-मन आणि धनापासून भारताला संघटिक बनविण्यासाठी स्वतःला अर्पण केले पाहिजे.

स्वामीजींची अजून एक गोष्ट आपण स्विकारणे गरजचे आहे, ती म्हणजे नकारात्मकेतून मुक्त होणे व मुक्त राहणे, कोणतही अनैतिकतेचे बंदिवान होऊ नका. व्यसने तुम्हाला गुलाम करतील. भ्रष्टाचार तुम्हाला कमजोर करील, आळस तुम्हाला पराक्रमशुन्य करील. तुमचे हे व असे इतर शत्रू तुमच्यावर गुहेतील श्वापदासारखे टपून आहेत. माणसे जीवनसत्वांच्या गोळ्या घेतात; पण जीवनातील सत्व हरवून बसतात. सत्यशोध, स्वत्वबोध या युवकांच्या जीवनातील नियामक शक्ती असल्या पाहिजेत असा त्यांचा संदेश आहे.

आज कुणीही काहीही म्हणोत पण खऱ्या अर्थाने भारताला सुपर पावर बनविण्याचे स्वप्न (Vision-2020) हे स्वामिजींनी १८८० मध्येच पाहिले होते. तरुणांशिवाय ते अशक्य आहे. याची जाण ठेवून देशासाठी वाहून घेण्याची तयारी आपण ठेवली पाहिजे. त्यासाठी धाडस गरजेचे आहे.

''कारण हे जग फक्त धाडसी लोकांकरिता आहे.''

**कु. संजिवनी ग. ढोरे**

एम.ए. भाग २ (इतिहास)

# स्त्रियांचे मानवाधिकार व भारतीय कायदे

मानवधिकाराची संकल्पना ही लोकशाही, न्याय, स्वातंत्र्य समता आणि मानवी प्रतिष्ठा ह्याच्याशी निगडित आहे. मानवतेची मुल्ये सर्वात्रिकतेने लागू करण्याचा प्रयत्न करणे हा हेतू मानवधिकारामागे आहे.

प्रत्येक मानवाला जीवन जगण्याचा सामाजिक प्रतिष्ठेचा आणि गुणवत्तेचा आदर करणे हा मानवी अधिकाराचा आधार आहे. ऐक ते मूल्य आहे. संयूक्त राष्ट्रसंघाच्या मानवी अधिकाराच्या वैश्विक जाहिरनाम्यात कोणत्याही व्यक्तीला यातना, अमानूष क्रुरता किंवा मानहानीची वागणूक भोगावी लागता कामा नये असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

भारतात कायद्याद्वारे स्त्रियांना खालील प्रकारचे मानवाधिकार बहाल करण्यात आलेले आहेत.

**अ) भारतीय दंड संहिता (इंडियन पीनल कोड) १८६०**

१. कलम १०० नुसार जर एखादा पुरुष महिलेवर बलात्कार करण्याच्या हेतूने तिचेवर हमला करीत असेल तर त्या महिलेला स्वतःच्या बचावासाठी हमला करणाऱ्यास ठार मारण्याचाही अधिकार आहे.

२. कलम २९४ नुसार जर एखाद्या पुरुषाने महिलेला त्रास देण्याच्या उद्देशाने कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी अश्लिल वर्तन करणे, अश्लिल गाणे म्हणणे किंचा अश्लिल बोलणे दंडिनय अपराध आहे. अशा व्यक्तिला तीन महिन्यांचा तुरुंगवास किंवा दंड या दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

३. कलम ३१३ नूसार जी एखादी व्यक्ती कोणत्याही महिलेला तिच्या सहमतीशिवाय गर्भपात करण्यास प्रवृत्त करीत असेल तर तो दंडनीय अपराध आहे. अर्भकासोबत मातेचा मृत्यु झाल्यास अशा व्यक्तीला आजीवन कारावास किंवा दंड अशा दोन्ही शिक्षा भोगावी लागते.

४. कलम ३२७ नूसार एखादी व्यक्ती महिलेस किंवा तिच्या नातेवाईकांकडून संपत्ती मिळविण्याच्या अभिलाषेने मारहाण करीत असेल किंवा महिलेकडून किंवा तिच्या नातेवाईकाकडून अवैध काम करुन घेत असेल तर तो अपराध आहे. अशा व्यक्तीला दहा वर्षापर्यंत तुरुंगवास किंवा दंड भोगावा लागेल.

५. कलम ३६६ नूसार एखादी व्यक्ती एखाद्या महिलेस विवाह करण्यासाठी प्रवृत्त करण्याच्या हेतूने पळवून नेत असेल किंवा अशा महिलेशी जबरदस्ती करण्याच्या हेतूने तिला पळवून नेत असेल तर तो अपराध आहे. अशा व्यक्तीला दहा वर्षापर्यंत तुरुंगवास आणि दंड अशी शिक्षा होऊ शकते.

**ब) दंड प्रक्रिया संहिता (क्रिमीनील प्रोसीजर कोड) १९७३**

१. कलम–४७(२) नुसार जर पोलीस एखाद्या घरातील वारंटच्या आधारावर चौकशी करीत असेल परंतु त्या घरात बुरखाधारी महिला राहात असेल आणि संशयीत उपस्थित नसेल तर पोलीस अशा घरात प्रवेश करण्यापूर्वी त्या महिलेस इतरत्र जाण्याची सूचना करेल.

२. कलम (५१)(२) नूसार एखाद्या स्त्री संशीयीतेची चौकशी स्त्रीकडूनच केली जाऊ शकते. चौकशी करणारी स्त्री शिष्टतेची काळजी घेईल. अशा प्रकारच्या चौकशी दरम्यान कोणताही पुरुष उपस्थित राहणार नाही.

३. कलम ५३(२) नूसार जर एखाद्या संशयीत गुन्हेगार महिलेच्या शरीराची वैद्यकीय तपासणी करण्याची आवश्यकता भासत असेल तर अशावेळी वैद्यकिय तपासणी महिला डॉक्टरच करेल किंवा महिला डॉक्टरच्या देखरेखीखाली ती तपासणी केली जाईल.

५४. कलम ९८ नूसार जर अवैध उद्देशाच्या हेतूने केलेला एखाद्या महिलेचा किंवा १८ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलीच्या अपहरणाची किंवा अवैध नजरबंदी सबंधीची तक्रार शपथपत्रासोबत केली असेल तर जिल्हाधिकारी किंवा उपविभागीय अधिकारी किंवा प्रथम श्रेणी न्यायाधिश त्या महिलेस तत्काळ मूक्त करणे किंवा मुलीला पालकांकडे सोपविण्याचा आदेश देऊ शकतात. त्याकरिता प्रसंगी बळाचा वापरही करु शकतात.

**क) इतर कायदे :**

१. समान श्रम अधिनियम १९७६ नुसार एकच काम किंवा सारख्या स्वरुपाचे कार्य करणाऱ्या महिला कामगारांचा पुरुषांच्या बरोबरीचे वेतन मिळते.

३२. कारखाना अधिनियम १९४६ नूसार महिला कामगाराकरिता स्वतंत्र शौचालय असेल. ज्याठिकाणी ३० महिला कार्यरत असतील अशा ठिकाणी त्यांच्या ६ वर्षापेक्षा कमी

वयाच्या मूलामूलींसाठी पाळणा घराची व्यवस्था करावी लागते. याशिवाय महिला कामगाराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांना रात्री सात वाजतापासून सकाळी सहा वाजताच्या आधी कामावर बोलावता येणार नाही.

३. कर्मचारी राज्य विमा अधिनियम १९४८ नूसार विमाधारक महिला कामगारांना मातृत्वलाभ देय आहे. तिला मातृत्वाकरिता १२ आठवड्यांची परिश्रमीक रजा मिळेल. त्यात ६ आठवडे प्रसुतीच्या आधिचा काळ समाविष्ठ आहे.

४. खाण अधिनियम १९५२ नूसार कोणत्याही महिलेला जमीनीच्या खाली असलेल्या कोणत्याही खाणीमध्ये काम दिले जाणार नाही. त्याचप्रमाणे जमिनीच्या वर असलेल्या खाणकामात सकाळी ६ वाजता पासून रात्री ७ वाजेपर्यंतच कामावर ठेवले जाऊ शकते.

**निष्कर्ष** :

भारताचे संविधान मूलभूत हक्काच्या दृष्टीने स्त्रीपुरुष समानता मान्य करते. परंतु प्रत्यक्षात स्त्रीयांच्या समस्या आजच्या आधूनिक जगात कमी होण्याऐवजी वाढत असल्याच्या जाणतात. अशिक्षित असो की सुशिक्षित अनेक स्त्रिया सामाजिक, आर्थिक शैक्षणिक, सांस्कृतिकदृष्ट्या पीडित असल्याचे दिसते.

संविधानानुसार निश्चित स्वरुपाचे निर्देश नसल्यामुळे समानता, जागरुकता नसल्यामुळे स्त्रियांच्या गरजा, त्यांचे प्रश्न वेळोवेळी उपस्थित होतात. म्हणूनच भारतात कायद्याद्वारे स्त्रियांच्या विविध समस्यांवर मार्ग काढण्याचे प्रयत्न करण्यात आले. देशात स्त्रिविषयक अत्याचाराला त्यामुळे आळा बसण्यात मदत झाली म्हणून त्यासंबंधी जनजागृती होणे आवश्यक असून काही कायद्यांमध्ये परिस्थितीजन्य बदल करण्याची गरज जाणवते. भारतीय कायदे सद्या प्रतिबंधात्मक कमी आणि घटनोत्तर अधिक वाटतात. समाजात स्त्रीविषयक मानवधिकारा संबंधी लोकांना समज देणे काळाची गरज आहे. त्याकरीता शासकीय स्तरावर आणि न्यायालयीन प्रक्रियेच्या माध्यमातून परिसवांद, चर्चासत्रे घडवून आणून ते कागदावरच न राहता लोकांच्या ज्ञानात भर पाडणारे असावे. तेव्हांच स्त्री सबलीकरणाला खरा अर्थ होईल.

**मोहम्मद शरीफ जफरउल्ला खाँन**

एम.ए. १ (इतिहास)

# आई

''स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी''

आई ईश्वराने दिलेली अनमोल अशी देणगी, आईला कोणी देव, कोणी लंगड्याचा पाय तर कोणी आंधळ्याचा डोळा, कोणी जन्माची शिदोरी तर कुणी ईश्वराचा आत्मा म्हणतात. आईच्या अशा अनेक व्याख्या केल्या जातात परंतु आईची व्याख्या काही एकच होऊ शकत नाही. म्हणतात ना... धरितीचा केला कागद, आकाशाची केली शाई तरी आईचा महीमा लिहिल्या जाणार नाही. संपूर्ण विश्वभर एकच शब्द इतका विशाल आणि व्यापक आहे की, या शब्दात सर्वजण सामावलेले आहेत.

आई हा शब्द म्हणायला खूप सोपा आहे. पण त्यागाशिवाय हा उच्चारला जाऊ शकत नाही. मातृदीन साजरा केला जातो त्या दिवशी आईसाठी आपण काय केले, हे तर सोडा जगातील कित्येकांना हेसुद्धा माहीत नसते की ८ मे हा दिवस कोणता दिवस आहे आणि तो मातृदिवस म्हणून साजरा करतो. जी आई आपली आवडनिवड, मित्र, उदासिनता सर्व विसरुन आपल्या बाळाला जेवण कोणतं आवडतं त्याला काय आवडत हे सर्व तिला माहीत असते. आणि तुम्ही सांगा आजपर्यंत आईला आपण किती ओळखलं? आईला ओळखणार की फक्त स्वतःचीच काळजी घेणार?

'जगात असे एकच न्यायालय आहे की जिथे सर्व गुन्हे माफ होतात ते म्हणजे आईचे हृदय' आई आपल्या जीवनातील प्रथम गुरु आहे. आईच आपले सर्वस्व आहे. आईसारखी माया आपल्यावर दुसरी कोणतीच स्त्री करु शकत नाही. परंतु आजची परिस्थिती आपण पाहिली तर आजची युवा पिढी पैशाच्या ओढात इतके पुढे गेली आहे की त्यांना या विश्वात ज्यांनी आणले, बालपणी त्यांचे पंख होवून उडायला शिकवलं, बोट धरून चालायला शिकवलं, बाळ जसा बोबडा बोलला तसे आई–वडील बोलतात एवढंच नाही तर जेव्हा आपल्याला शी आणि सु सुद्धा समजत नव्हती तेव्हा त्याच ओल्या बिछान्यावर स्वतः झोपली आणि नंतर बाळाला कोरड्या जागेवर टाकते जेव्हा आपल्याला ताप येतो तेव्हा आई रात्रभर जागरण करुन

पाण्याच्या पट्ट्या बदलवते. रात्री बेरात्री जागून काढ्याचा चहा करते. आपले अंग चोळते, आपली काळजी घेते. जखम मुलाला होते परंतु त्याच्या वेदना मात्र या माऊलीच्या हृदयात होते.

पण आजच्या परिस्थतीत तीच मुलं तिच्यावर हात उचलतात, तिला शिवीगाळ करतात. एवढेच नव्हे तर त्यांची पत्नी येताच आईला घराबाहेर हाकलून देतात किंवा वृद्धाश्रमात नेऊन टाकतात. त्यावेळी काय अवस्था होत असेल त्या माऊलीची. तिच्या हृदयाची कर्जफेड आजची युवा पिढी अशी करत आहेत. किती लाजीरवाणी गोष्ट आहे. आजची युवापिढी ह्या माऊलीला ही शिक्षा देते जिने आपल्याला जन्म दिला, जन्मभर संकटावर मात करुन, जिवाचे रान करुन, तिने मृत्युशी झुंझ देत आपल्याला जन्म दिला. आपले संगोपन केले, या जगात ताठ मानेने जगण्याच्या लायक बनविले.

''मुलं हीच आईवडीलांची म्हातारपणाची काठी असते'' त्यामुळे प्रत्येक युवकाचे हे कर्तव्य आहे की, त्यांनी आपल्या आईवडिलांची सेवा करावी, त्यांचा सन्मान करावा, कारण ही संधी एकदाच जीवनात मिळते. आपण सुद्धा जीवनात कुणाचे तरी आई वडील असणारचं त्यामुळे आपण आपल्या आईवडिलांची सेवा केली. त्यांचा सन्मान केला तरच आपली मुलं देखील आपला सन्मान करतील. कारण समाज हा अनुकरणप्रिय आहे. पैशाच्या आधारावर माणूस समोर जात आहे. पैशाने सर्व गोष्टी मिळतील पण आई आणि आईची माया पैशाने कधीच विकत घेता येत नाही.

'वो कौनसी चिज है, जो यहा नही मिलती;
सबकुछ मिलता है, लेकीन माँ नही मिलती।'

जरा आपले बालपण आठवा, आपण शाळेत गेलो, पाच वाजले, शाळा सुटली, सर्व मुले घरी गेली पण माझा मुलगा माझी मुलगी अजूनपर्यंत का आली नसेल ही चिंता करणारी फक्त आईच असते. खुप दिवस झाले ऐकल्या नाही, आईच्या गोड गोड रागावून शिव्या. दप्तर टाकून खेळायला गेली परंतु आतापर्यंत का आला नाही, का आली नाही हे वाक्य आईचे मी कधीच विसरणार नाही. ती जवळ असते तेव्हा तिची किंमत कळत नाही परंतु ती जेव्हा आपल्यापासून खूप दूर निघून जाते तेव्हा तिची किंमत कळते त्यावेळी सगळं जग आपल्याला नकोसे वाटते. पण जेव्हापर्यंत आपली चुक आपल्या लक्षात येते तोपर्यंत खूप उशीर झालेला असतो आणि आपण काहीही करु शकत नाही म्हणून प्र.के. अत्रे म्हणतात की,

''आई असेपर्यंत तिची
किंमत वाटत नाही
पण ती गेल्यावर
मग जगात कशाचीच
किंमत वाटत नाही''

आई अपेक्षाच काय करते हो, आपल्या जवळून निस्वार्थपणाने आपल्यावर प्रेम करते. एकच अपेक्षा असते तिची आपण तिच्या वृद्धापकाळात तिच्या म्हातारपणीचा सहारा व्हावा. एवढचं ना... एकदा स्वप्नांच्या जगात असतांना मी नकळत आईला प्रश्न केला, आई देव हा एकच आहे तर तो आपल्याजवळ का राहत नाही? तेव्हा आई हळुच हसली आणि उच्चारली जगात खुप मुलं आहेत आणि सर्व देवाची प्रिय आहेत. सर्वांसाठी असंच वाटत असेल की, देव आपल्याजवळ असला पाहिजे पण देवाला प्रत्येकाच्या घरी राहणे शक्य होत नाही. म्हणून देवाने प्रत्येकाला ''आई'' दिली.

म्हणून आई देवाने पाठवलेली सुंदर अशी देणगी आहे.

**कु. डिना मनोहर धुर्वे**
बी.ए.३

# राष्ट्रमाता जिजाऊ

जिजाऊ ह्या एक प्रेरणाशक्तीच आहेत. जिजामातेची आतापर्यंत पाच चरित्रे प्रकाशित झालेली आहेत. जिजामातेचा विवाह सन १६०६ मध्ये दौलताबाद येथे पार पडला. राष्ट्रमाता जिजाऊ ही १७ व्या शतकात वावरत होती. त्याकाळाचे सर्वांगीन ज्ञान प्राप्त करुन घेतल्याशिवाय जिजाऊचा व्यक्तिविकास कसा झाला. ती कशी बनली हे आपल्याला कळू शकणार नाही. मी तर म्हणेल त्या घराण्यातील त्यांच्या पूर्वीच्या काही पिढ्यांच्या अभ्यासाची जिजाऊ कळण्याकरीता आवश्यकता आहे. कारण भारतीय समाज हा रुढीवादी आणि परंपराप्रिय आहे. तसेच धार्मिक प्रवृत्तीचा आणि अंधश्रद्धाळू सुद्धा आहे. त्यादृष्टीने जिजाऊ ह्या काळाच्या कितीतरी पूढे होत्या. त्या बुद्धीमान होत्या. सती प्रथा आणि धार्मिक परिवर्तन ह्या परंपरागत अमानवीय रुढी विरुद्ध जिजाऊ का बंड करुन उठल्या ? हा विचार महत्वाचा ठरतो. हा वारसा जिजाऊला तिच्या मातेपासून आणि सासूपासून मिळाला. हे सत्य नाकारुन चालणार नाही.

जिजाऊला आपले ध्येय आणि पतीच्या महत्वाकांक्षेच्या पूर्ततेसाठी म्हणजे स्वराज्य कार्यासाठी सती जाण्याचा निर्णय बदलावा लागला असे म्हणण्यावाचून गत्यंतर नाही. जिजाऊच्या कर्तृत्वाच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास त्या केवळ मुलाला जन्म देणाऱ्या सामान्य माता नव्हत्या तर आपल्या मुलाला आणि समाजाला घडविणाऱ्या असामान्य आदर्श लोकमाता होत्या. त्यांचे प्रशासन हे न्यायप्रिय असून विचार नैतिक दृष्टीने उच्च कोटीचे होते. त्यांचा न्यायक्षेत्रातील अधिकार सर्वश्रेष्ठ होता. जिजाऊचा राष्ट्रीय आणि मानवीय दृष्टीकोन लक्षात घेता त्या खऱ्या अर्थाने राष्ट्रमाता होत्या. केवळ पुत्राला जन्म देऊन राजमाता होणे वेगळी गोष्ट आणि शुन्यातून राज्यनिर्मिती करुन राज्याच्या गादीवर पूत्राचा राज्यभिषेक घडवून आणणे असे हे आगळे-वेगळे कर्तृत्व या राजमातेचे होते. जिजाऊच्या जन्मास १२ जानेवारी १९९८ रोजी ४०० वर्षे पूर्ण झाले आहेत. राष्ट्रमाता जिजाऊ ही केवळ १७ व्या शतकातील इतिहासाची जननी नव्हे तर वर्तमानकाळाची आणि भविष्यकाळाची ती अखंड स्फुर्तीदात्री आहे.

जिजाऊसाहेबांनी शिवनेरी गडावरील शिवाई देवीला नवस केला. शिवाईदेवी नवसाला पावली आणि मुलगा झाला. त्या मुलाचे नाव शिवाईदेवीच्या नावावरुन शिवाजी ठेवले. हे साफ खोटे आहे. ही बखरकारांनी निर्माण केलेली दंत कथा आहे. हे खालील पूराव्यावरुन स्पष्ट होते. शिवाजी महाराजांच्या दरबारातील भाट कविंद्र परमानंद याने आपल्या शिवभारत या ग्रंथात शिवनेरी गडावर जिजाऊला पूत्र झाला. ''शिवनेरी गडाच्या नावावरुन बाळाचे नाव शिव ठेवले. असे स्पष्ट लिहून ठेवलेले आहे.''

जिजाऊचा केवळ आदर्श समोर ठेवून चालणार नाही. त्या ध्येयाने पेटून उठल्या शिवाय शिवाजी निर्माण होणे शक्य नाही. सर्व संतश्रेष्ठ शिरोमणी तुकाराम महाराजांनी स्पष्ट सांगितले आहे की, ''नवसे कन्या पूत्र होती तर मग का करणे लागे पती'' वास्तविक भोसले घराण्याचे कुलदैवत भवनी देवी हे होय.

**कु. रेणुका प्र. बाभुळकर**

एम.ए. २ (इतिहास)

# सावित्रीबाई भू लोकावर अवतरल्या तर...

''न स्त्री स्वातंत्र्यं अईती'' या मनुवचनाला स्त्रीने केव्हाच कालबाह्य ठरविले आहे. तरी आजही वृत्तपत्रातून स्त्रीयांवरील अन्यायाच्या बातम्या रोज प्रसिद्ध होत असतात. स्वार्थाने बरबटलेल्या आजच्या समाज व्यवस्थेमध्ये जेव्हा एखादा ध्येयवादी माणूस आदर्शाच्या शोधात धडपडतो, तेव्हा असे आदर्श न आढळल्याने त्याची दारुन निराशा होणे स्वभाविकच आहे. परंतु जेव्हा तो अंतर्मूख होवून मागील शतकाचा वेध घेवू लागतो तेव्हा मात्र त्याच्या दृष्टीसमोर हिमालयासारखी उत्तुंग अशी अनेक व्यक्तीमत्वे उभी राहतात आणि मग अशा त्या ध्येयवादी पण आगतिक माणसाचे मन –

इथली 'जिवनाची तहान सांगा केव्हा संपायची?' असे आक्रंदू लागते आणि अशा या संभ्रमावस्थेत असतांना कधी कधी त्यांच्या मनात येते ''आज क्रांतीज्योती सावित्री पुन्हा एकदा या भू लोकावर अवतरल्या तर....''

रंजल्या गांजल्यांना अक्षर ओळख करुन देणारी, प्रौढ शिक्षणाची जन्मदाती. प्रतिकूल वातावरणात समाजसुधारणेचे कार्य पुढे नेले. जेव्हा बायांना घराबाहेर जाण्याची परवानगी नव्हती स्त्रीचे अस्तित्व फक्त चुल आणि मुल एवढेच मर्यादीत होते. अशा काळात सावित्रीबाई यांनी ज्योतीबांच्या सहकार्याने समाजात परिवर्तन घडवून आणले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवनकार्य मानव जातीला प्रेरणा देणारे आहे. अशा या सावित्रीबाईंचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी नायगांव या खेड्यात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव खंडोजी तर आईचे नाव लक्ष्मीबाई होते.

सावित्रीबाईचे बालपण लाडात आणि सुखात गेले. त्याकाळी बालविवाहाची पद्धती होती. सावित्रीबाई ५ वर्षाच्या असतांना त्यांचा विवाह १३ वर्षीय ज्योतीबा यांच्याशी झाला. त्यावेळी सावित्रीबाई अशिक्षित होत्या, पण त्यांना शिक्षणाबद्दल गोडी होती. त्याकाळी मुलींना शिक्षणाचा अधिकार नव्हता. मुलींनी शिकणे हे योग्य मानले जात नव्हते. त्यावेळी दीनदलीत गरिबांवर अनेक अत्याचार होत. त्यांना खूप हाल अपेष्टा सहन कराव्या लागत. शिक्षणाचा अधिकार केवळ उच्चवर्गीय यानांच होता. सावित्रीबाईंनी लग्नानंतर ज्योतीबांना शिकविण्याबद्दल विनवणी केली व ज्योतीबांनी सावित्रीबाईंना शिकविण्याचा निर्णय घेतला व त्याकाळी प्रतिकूल परिस्थिती असतांना, घरच्यांचा विरोध असतांनाही त्यांनी सावित्रीबाईंना शिकविले. सावित्रीच्या रुपाने त्यांचे मुलींना शिकविण्याचे स्वप्न साकार झाले. मिसेस मिचेल या इंग्रज बाईने सावित्रीला शिक्षिकेचा कोर्स करण्यास सांगितले व १८४७ मध्ये सावित्रीबाई प्रशिक्षित शिक्षीका झाल्या. प्रशिक्षण घेतलेल्या त्या पहील्या महिला शिक्षिका झाल्या. १ जानेवारी १८४८ ला बुधवार पेठेतील भिडे वाड्यात ज्योतीबांनी आणि सावित्रीबाईंनी कार्य केले. त्यावेळी त्यांना कधी शिक्षिका, संचालिका तर कधी मुख्याध्यापिका अशा अनेक जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागल्या. सावित्रीबाई व ज्योतीबांनी १८४८ ते १८५२ पर्यंत दिनदलीतांच्या मुला–मुलींसाठी २० शाळा काढल्या.

सावित्रीबाईंनी लेखनाच्या माध्यमातूनही त्याकाळच्या अयोग्य परिस्थितीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. त्यांनी ''काव्यफुले'', ''बावणकशी'', ''सुबोध रत्नाकर'' ह्या साहित्यकृती प्रकाशित केल्या. १८६३ मध्ये 'बालहत्या प्रतिबंधक गृह' स्थापन केले. ज्योतीबा व सावित्रीबाईंनी बालहत्या थांबावी व बालविवाह, बालविधवांना पूर्ण संरक्षण मिळावे म्हणून या गृहाची स्थापना केली. याच गृहातील काशीबाई नावाच्या ब्राम्हण विधवेचा मुलगा १८७३ साली ज्योतीबांनी दत्तक घेतला व त्याचे नांव यशवंत ठेवले व त्याला आपले नाव दिले. जातीयता नष्ट करण्याच्या उद्देशाने ज्योतीबांनी आपला मुलगा यशवंत याचा विवाह दुसऱ्या जातीच्या मुलीशी लावून दिला. तसेच त्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. ज्योतीबांनी आपले सर्व आयुष्य दीनदलीतांच्या उद्धारासाठी वाहीले. त्यांचे सर्व कार्य सुरु असतांनाच त्यांना अर्धांगवायू झाला व या आजारातच २७ नोव्हेंबर १८९० मध्ये ज्योतीबा या समाजसुधारकाचा मृत्यू झाला. सावित्रीचा आधार तुटून पडला पण त्या डगमगल्या नाही. त्यांनी तो आघात निमूटपणे सहन केला. आधी त्या मनाने सावरल्या. कारण त्यांना ज्योतीबांचे कार्य पूर्ण करायचे होते. एक चाक निखळून पडले तरी

दुसऱ्या चाकाला फिरण्याचा वेग कायम ठेवायचा होता. हे अशक्य असले तरी ते सावित्रीबाईंनी शक्य केले व त्या पुन्हा आपल्या कामाला लागल्या. उत्साह नव्हता पण त्यांची प्रेरणा प्रबळ होती.

ज्योतीबानंतर सावित्रीबाईंनी १८९३ मध्ये सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष पद भुषविले.

ज्यावेळी महाराष्ट्रात १८९७ मध्ये महाभयंकर प्लेगच्या साथीमुळे मोठ्या प्रमाणात जीवीत हानी झाली, त्यावेळी सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजाच्या मदतीने प्लेगग्रस्त लोकांना मदत करण्याकरीता अनेक प्रयत्न केले. त्यांनी सरकारची सुद्धा मदत मागितली परंतु त्यांचे हे प्रयत्न व्यर्थ ठरले. अखेर त्यांनी वैयक्तिकरित्या लोकांची सुश्रूषा केली. त्यांनी केलेली दगदग त्यांच्या शरीराला सहन झाली नाही व दिवसेंदिवस त्यांची प्रकृती क्षीण होत गेली. अखेर १० मार्च १८९७ मध्ये त्यांनी जगाचा निरोप घेतला. त्या अनंतात विलीन झाल्या.

अशा या क्रांतीज्योती सावित्रीबाईंचा स्त्रीच्या विकासात सिंहाचा वाटा आहे. नंतरच्या काळातही सावित्रीबाईंच्या पावलावर पाऊल टाकून अनेक व्यक्तींनी स्त्रीविषयक प्रश्नांवर प्रकाश टाकला पण दीडशे वर्ष होऊनही खरोखरच स्त्रीची प्रगती झाली काय? स्त्रीला सर्व अधिकार मिळाले काय ? स्त्री पूर्णपणे स्वतंत्र झाली असे म्हणता येईल काय? या प्रश्नांची उत्तरे नक्कीच 'नाही' अशीच येईल.

म्हणून मग आपण आपल्या निर्मीकाला एक अर्ज सादर करु की आज पुन्हा एकदा स्त्री उद्धारासाठी स्वर्गातून सूटी देवून ज्योतीबा व क्रांतीज्योती सावित्री यांना भू लोकावर प्रगट करा जेणेकरुन स्त्रीची शिक्षण घेऊन होणारी दुर्दशा, हुंडाबळी, बलात्कार हे त्याना दिसेल व त्यातून त्या मार्ग काढतील. हीच ईश्वराला स्त्रीची हाक आहे.

**कु. रश्मी प्र. मोहोड**

बि.ए. ३

# आनंद

'आनंदाचे डोही आनंद तरंग' या ओळीत तुकाराम महाराजांना यत्र तत्र सर्वत्र आनंदच दिसतो. सगुणातही, निर्गुणातही आणि त्यांच्या विलयातही आनंदाचे मूळ डोहात म्हणजे अंतरंगात आणि पर्यायाने तो उमटतो तरंगात, म्हणजेच बहिरंगात. या आनंदात रममाण झालोय असे ते म्हणतात.

आनंद ही मनाची एक स्थिती आहे. पण आपण तो बाहेर शोधत असतो. व्यावहारिक जगात वावरतांना 'खुश होणे' या स्थितीलाही लोक आनंद असेच म्हणतात.

आनंद हे तीन प्रकारचे असतात. एक जो स्वतः अनुभवला, दुसरा जो इतरांच्या आनंदात सामावलेला आणि तिसरा जो या निसर्गात भरभरुन राहिलेला आहे. आपण मनुष्यप्राणी मात्र या सगळ्या आनंदाकडे दुर्लक्ष करतो. दुसऱ्या कोणत्या न कोणत्या हव्यासापोटी दुःखी झालेलो असतो.

आईचे निर्व्याज प्रेम, मित्रमंडळींची साथ, कुटुंबीयांच्या सहवासाचा आनंद हे चिरंतन आनंद आहेत. पण त्याकडे आपले दुर्लक्ष होते. कारण आपल्या डोळ्यांवर हव्यासाची चादर आपणचं ओढलेली असते. त्यामुळे प्रकाशाच्या स्वच्छ किरणांना आपण मनाच्या गाभाऱ्यात प्रवेशच करु देत नाही.

आनंदाची मानसिक स्थिती आणि मानसिक शक्ती हे नेहमी एकत्र असतात. दुःखी कष्टी, क्रूर मानसिकता असलेले मन भोवताली भरभरुन आनंद असतानांही एकटे पडते; तर प्रबळ सकारात्मकता अशक्य ते शक्य, दुःखातही सुख शोधणारी मानसिकता असलेले मन आजूबाजूला कोणतीही परिस्थिती असली तरी आनंदाचीप्राप्ती करु शकते.

सुख आणि दुःख या मानवी आयुष्याच्या दोन बाजू आहेत. आयुष्यात कायमच आपण सुखात राहू, आनंदी असू असे नाही. पण दुःखापासून पळ काढणे हे पळपुटेपणाचे लक्षण आहे. मात्र त्यावेळी दुःखाचे पांघरुन ओढून आनंद अशक्यप्राय मानणे हे दुर्बलतेचे लक्षण आहे. आयुष्यातले काही क्षण आपण दुःखी

झालो तर काय झाले? संकटावर मात करु शकत नाही ही माझी मानसिकता नाही माझी ही जिद्द आहे.

आजच्या आधुनिक युगात दूरध्वनी , भ्रमणध्वनी, ई–मेल, संगणक याद्वारे आपण फक्त एकमेकांच्या संपर्कात राहत आहोत. कळत–नकळत आपुलकी, सुख वाटल्याने द्विगुणित झाल्याचा आनंद, दुःख सांगितल्याने हलके झाल्याचा अनुभव या सगळ्यापासून आपण वंचित होत आहोत. थोडक्यात काय तर आपल्या संस्काराच्या मुळाशी जीवनाचा आनंद दडलेला आहे. त्याला बाहेर काढा. सांभाळा. वृद्धीगत करा. मग बघा आसुष्याचा वटवृक्ष कसा बहरेल ते ! माझ्या शुभेच्छा तुमच्याबरोबर आहेत.

**कु. प्रिया नारायणजी सांबारे**

बि.कॉम. २ (मराठी)

# स्वच्छतेकडून समृद्धीकडे

राष्ट्र जागवा, राष्ट्र जागवा, जागृत व्हा तरुणांनो ।
विर वृत्तीचस दिवा उजळवा, जागृत व्हा तरुणांनो ।।

आज २१ व्या शतकात भारताची प्रगती खरोखरच वाखण्याजोगी आहे. त्रिकोण एक आकृती, ज्यांच्या एका टोकाला भारताचे चंद्रावर पाऊल तर दुसऱ्या टोकाला मंगळ मोहिम. पण त्रिकोणाच्या तिसऱ्या टोकाला कुठेतरी तरुणाईचे पर्यावरणाकडे होणारे दुर्लक्ष! पर्यावरणाचा ऱ्हास ही गोष्ट मात्र मानवाच्या हृदयालां खुपणारी आहे. ज्याच्यामुळे या पूर्ण विश्वाची दिशा ही नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. पण त्याकडे बघायला वेळ कुणाकडे?

तरुणाई, तरुणाई, तरुणाई म्हणजे काय हो? प्रचंड इच्छाशक्तीने भरलेले आपले मन 'लाथ मारीनं तेथुन पाणी काढीन' ही वृत्ती, ही इच्छाशक्ती असलेले आपले शरीर. पण आज हीच युवाशक्ती, हीच तरुणाई पर्यावरणाची अस्वच्छता करतांना आपल्याला दिसत आहे. ही केवढी दुःखाची आणि खेदाची गोष्ट आहे की ज्या वयात 'लाथ मारीन तेथून पाणी काढीन' याऐवजी 'लाथ मारीन तेथे झाडे पाडीन' हे दृष्य आपल्याला दिसत आहेत.

वृक्षवल्ली आम्हा सोयरे । वनचरे,
पक्षी सुस्वरे आळवीती,
नाही घर, नाही दार, ज्यास नाही रे माऊली ।
अशा अभागी जिवाला वृक्ष देतो रे साऊली ।।

पण याच वृक्षाची कत्तल करुन, पर्यावरणात अस्वच्छता पसरवण्याचे काम या मानसाने केलेले आहेत. कारण याच अस्वच्छतेमुळे नवनवे आजार, विकार, रोगराई ही पसरत चाललेली आहे. माणसाची खरी संपत्ती ही पैसा नसून स्वस्थ शरीर हेच आहेत. म्हणुनच म्हणतात ना, जब सब रस्ते हो साफ, बिमारिया हो जाए half!

या पृथ्वीला या पर्यावरणाच्या स्वस्थतेला स्वेच्छेने तरुणाने स्वतःचा खारीचा वाटा दिला तर या पर्यावरणाला, या पृथ्वीला समृद्ध व्हायला वेळ मात्र लागणार नाही.

गेल्या वर्षीच बघाना २ डिसेंबर २०१५ ला दक्षिण भारतात आलेल्या प्रलयाने दोन दिवसात काय हाहाकार माजवून टाकला, पण जर तेथे पर्यावरणाची स्वच्छता राखली असती तर कदाचित या संकटाला सामोरे जावे लागले नसते. पण आपण देवालाच म्हणतो,

सर्वपी सुखीनः सन्तू। सर्व सन्तू निरामयाः

सर्वे भद्राणी पश्यन्तु। मॉ कुश्यीत दुःख माप्यनात

म्हणजे हे देवा सर्वांना सुखी ठेव, सर्वांना स्वच्छ व निरोगी आयुष्य दे पण आपणसुद्धा पर्यावरणात स्व्च्छता राखली पाहिजे, पर्यावरणात समतोलता राखली पाहिजे. हे कळुनही घ्यायला तरुणांजवळ वेळ सापडत नाहीत. म्हणून आजच्या तरुणाईला या पर्यावरणाचे महत्त्व या देशातील लोकांना पटवून सांगायचे आहे.

आपल्या देशात मोठ–मोठे कारखाने उभारण्यात येत आहे. ते गावापासून लांब बांधायचे आहे की ज्यामुळे कारखान्यातील धुरापासून गावातील लोकांचे शरीर निरोगी राहील. त्याचप्रमाणे त्या कारखान्यातील दुषित विषारी पाणी नदीत न सोडता त्याचे रिसायकल करुन पुन्हा तेच पाणी वापरायचे, ज्यामुळे पाण्याची स्व्च्छता राखली जाईल. हे सर्व फक्त तरुणाईच्या मदतीनेच शक्य होऊ शकते.

भारत जमीन का टुकडा नही।

जीता जागता राष्ट्र पुरुष है।।

यह वंदन की भुमी है, अभिनंदन की भुमी है।

इसका कंकर कंकर शंकर है, बुंद बुंद गंगाजल,

हम जियेंगे तो इसके लिए, मरेंगे इसके लिए।।

सरकार हे त्यांच काम करतच असतात.

१९७२ मध्ये हरितक्रांती

१९७४ मध्ये पाणी स्वच्छता कायदा

१९७६ मध्ये नागनदी बचाओ, नर्मदा बचाओ

१९८१ मध्ये हवा स्वच्छता कायदा

पण गरज आहे ती त्यांना सहकार्याची... अहो, श्री संत गाडगेबाबा १८७६ मध्ये अमरावतीत जन्म घेणारे

जे का रंगले गांजले। त्यासी म्हणे जो आपुला।।

तोचि साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा।।

ज्यांनी 'गावाकडे चला आणि ताजे तवाने व्हा' असे म्हणत गावेची–गावे त्यांच्या हातातल्या झाडूने स्वच्छ व निरोगी करुन काढली. खरच त्यांना आदर्श मानून नतमस्तक होऊन स्वच्छतेला पाठिंबा दिला पाहिजे.

नाही निर्मळ मन। काय करील साबण।।

माणसाने स्वच्छता ही स्वतःपासून म्हणजेच स्वतःच्या घरापासून करायला पाहिजे. त्यासाठी त्याने सर्वात आधी स्वतःच्या मनाची स्वच्छता करायला हवी तरच या देशाला, या विश्वाला समृद्ध व्हायला वेळ लागणार नाही.

रामधुनपूर्वी गावपूर्ण। व्हावे स्वच्छ सौंदर्यवान

घरोघरी गलिच्छपणा न दिसावे

घराघरांची होय दुरुस्ती, सौंदर्याची वाढे प्रिती

अस्वच्छतेच्या मिटे प्रवृती, वाढे वृत्ती सहकार्याची

खरोखरच गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जे करायचे त्यांच्याच पाऊलावर पाऊल टाकत आज या तरुण पिढीला, युवा शक्तीला एकत्र येऊन आज या गावाची, गावावरुन देशाची स्वच्छता करायची आहेत. आणि स्वच्छतेचे महत्त्व प्रबंधनातून लोकांना पटवून द्यायचे आहे की ज्यामुळे लोक खरोखरच पर्यावरणाच्या स्वच्छतेचे महत्त्व समजेल म्हणतात ना..

गाव हा विश्वाचा नकाशा। गावावरुन देशाची परीक्षा

गावाची भंगता अवदशा। येईल देशा

अशाप्रकारे आपल्या घरांची त्यातुन समाजाची, राज्याची, देशाची सर्व विश्वाची प्रगती म्हणजेच हे विश्व समृद्धीच्या दिशेने वाटचाल करेल

एकमेका साह्य करु, अवघे धरु सुपंथ।

आज या पृथ्वीवर हे ब्रिदवाक्य अंगी आणुन संपूर्ण भारत देश सुंदर व स्वच्छ करण्याचे ध्येय गाठू या...

**कु. मनिषा अनिरावजी गायधने**

बी.कॉम. ३ (इंग्रजी)

# प्रश्न प्रसारमाध्यमांचा...

लोकशाहीच्या प्रमुख चार आधारस्तंभात समाविष्ट असलेला प्रसारमाध्यम अर्थात मिडीया सर्वांच्या दैनंदिन जीवनाला स्पर्श करणारा बहुमूल्य घटक आहे. जगाचा एका दिवसाचा इतिहास सांगणारे वर्तमान पत्र असो, नभोवाणी, नियतकालिक, दुरचित्रवाणी, संगणक असो किंवा झोपेतून उठल्याबरोबर आपण ज्या वस्तुच्या शोधात लागतो तो भ्रमणध्वनी असो या सर्वांना आपण १) मुद्रीत माध्यम २) विजाणूशास्त्रीय माध्यम या दोन प्रकारात विभाजू शकतो.

आजच्या युगाला 'प्रसारमाध्यमांच युग' जरी संबोधले तरी अतिशोयक्ती होणार नाही, असं मला तरी वाटतं, जगाला तळहातावर आणलय व जनसामान्यांना नविन विचार दिलाय पण ही सुरुवात आपल्याला इ.स. ७६४–७७० मध्ये जापान येथे मुद्रीत केलेला सर्वात जुना मजकूर लिहील्या गेला असे इतिहास आपल्याला सांगतो. त्यानंतर ८६८ मध्ये चीन येथे 'हिरकसूत्र' हे पुस्तक मुद्रीत झाले असले तरी जर्मनीचा 'जोहान्स गुटेनबर्ग' याला मुद्रण कलेचा जनक म्हणून मान आजही आहे. त्याने इ.स. १४५६ मध्ये 'बायबल' ची छपाई करुन एक आशेचा किरण निर्माण केला. भारताचा जर विचार करायचा झाल्यास गोव्यात पोर्तुगीजांनी १५५६ मध्ये मुद्रणालयाला सुरुवात केली. विल्यम चार्ल्स याने देवनागरी लिपित मुद्रणालय सुरु केले. सेरामपूर, सुरत, त्रावणकोर, तंजावर (मराठी) इ. प्रसिद्ध मुद्रणालय होते.

वर्तमानपत्र प्रसारमाध्यमातील एक महत्त्वपूर्ण प्रभाव टाकणारे माध्यम आहे. जगातील पहीले वर्तमानपत्र इ.स. १६६६ मध्ये इंग्लंड येथे प्रकाशित झालेले 'लंडन गॅझेट' होय. नंतर अमेरीकेत 'पल्बीक ॲक्युरेंसेस' नावाने वर्तमानपत्र प्रकाशित झाले. भारतात विचार केल्यास जेम्स ऑगस्ट हिक्कीच्या नेतृत्वात कलकत्ता येथे इ.स. १७८० ला 'बेंगॉल गॅझेट' नावाचं वर्तमानपत्र प्रकाशीत झाले. परंतु भारतीय भाषेतून प्रकाशित हाणारे पहिले वर्तमानपत्र १८१८ ला बेंगाली भाषेतून 'समाचार दर्पण' होय. मराठी भाषेमध्ये 'दर्पण' १८३२ ला प्रकाशित झाले.

विशिष्ट कालावधीनंतर प्रसारीत होणारे पत्र म्हणजे 'नियतकालिक' होय. नियतकालिकांचा उदय वर्तमान पत्रापूर्वी झाला. जगातील पहिले नियतकालिक .स. १६६३ ला जर्मनीत निघाले. तिचे नाव 'इरबॅयुलिचे मोनाट्स'. युरोपात १८ व्या शतकात नियतकालिक निघाले त्यांचा उद्देश ज्ञानाचा प्रसार करणे हा होता. भारतात बेंगॉली भाषेतून प्रथम नियतकालिक सुरु झाले. त्यात 'एशियाटीक रिसर्चेस', 'इंडियन अँटीक्वेरी', मराठी भाषेतील 'दिग्दर्शन' हे पहिले मासिक होय. विजाणूशास्त्रीय माध्यमे हे आज जनसामान्यांच्या जीवनावर प्रभाव टाकणारे एक प्रभावी माध्यम आहे. त्यात नभोवाणी, दुरचित्रवाणी (हे दृकश्राव्य माध्यम आहे. हे सर्वात प्रभावी माध्यम मानल्या जाते), संगणक, ई वर्तमानपत्रे, D.T.H. इत्यादी.

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे पण आजच्या युगात परिवर्तन होण्याकरीता एक मात्र प्रभावी माध्यम आहे ते म्हणजे प्रसारमाध्यम. आज प्रसारमाध्यम प्रत्येकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होत आहे तर काही ठिकाणी झाला आहे. मिडीयाने आज प्रत्येक क्षेत्रामध्ये सक्रीयता दाखवून नविन जग निर्माण करण्याची क्षमता दाखवून दिली आहे.

समाजजीवनावर प्रसारमाध्यमांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात आहेत. प्रसारमाध्यमांतून प्रकाशित होणारी प्रत्येक घटना, बाब समाजमनाला स्पर्श करते. एक जागृत समाज घडविण्यात मिडीयाची सर्वात मोठी भुमिका आहे. समाजातील कानाकोऱ्यात जाऊन संबंधीत घटनेला न्याय देणे या सर्व बाबी आपल्याला, निर्भया, खैरांजली, हाजीअली दर्गा इ. घटनांतून दिसून येते.

लोकशाही देशांमध्ये 'मिडीयाला' लोकशाही एक सक्रीय स्तंभ म्हटल्या जाते. मिडीया आपल्या भुमिकेतून प्रत्येक बाब जनसामान्यांपर्यंत पोहचवू शकतो. अर्थात कोणता राजकीय पक्ष सत्तेत येणार किंवा सत्तेत आहे या प्रक्रियेत मिडीया सुद्धा महत्त्वपूर्ण भूमिका मांडते. थोडक्यात राजकीय पक्षांचे यश अपयश मिडीयावर अवलंबून असते असं म्हणन्यास हरकत नसावी. याचे आपल्यासमोर ताजे उदा. आहे २०१४ च्या लोकसभेच्या सर्वात्रिक निवडणूकीत भाजपा ला मिळालेले यश व दिल्ली विधानसभा निवडणूकीत अरविंद केजरीवाल यांना मिळालेले यश.

ऐतिहासिक काळापासून तर आजपर्यंत जनजागृती व प्रबोधन हे महत्वाचे कार्य मिडीया करीत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून वर्तमान पत्रांनी जनजागृती व प्रबोधन करुन स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाची भूमिका मांडली होती. आज सुद्धा तेच कार्य वर्तमानपत्रांच्या माध्यामातून होत असतांना आपल्याला दिसत आहे. लोकांमध्ये जागृत करुन जुन्या प्रथा, चालीरिती सोडून नवीन मार्गांचा स्वीकार करावा अशा प्रकारची भुमिका प्रसारमाध्यमांची असते. उदा. मुस्लीम समाजातील 'तलाक–ए बिदत' प्रथा.

ज्ञानाचा भंडार म्हणून आज प्रसारमाध्यमांकडे पाहिले जाते. जगातील कोणत्याही कोपऱ्यात एखादी घटना घडली असल्यास काही क्षणांतच ती आपल्यापर्यंत पोहचविण्याचे कार्य प्रसारमाध्यम करीत असते. मुद्रीत प्रकारातील माध्यमातून मोठ्या प्रमाणात ज्ञानाचा प्रसार केला जातो. त्याचबरोबर विविध वाहीन्या विशिष्ट वेळी मुलाखती, भाषणे, चर्चा प्रसारीत करतात. आज शैक्षणिक क्षेत्रातील विद्यार्थी ज्ञानाचा एक स्त्रोत म्हणून मिडीयाकडे पाहतात.

भारतीय संविधानाने कलम २५ ते २८ यात धार्मिक स्वातंत्र्य सर्वांना मिळाले आहे त्यानुसार धर्मप्रसार, प्रचार केला जातो. आज धार्मिक जीवनावर सुद्धा मोठ्या प्रमाणात प्रभाव मिडीयाचा आहे. धर्म ही एक संवेदनशील बाब आहे. येथे मिडीयाची सर्वात मोठी परीक्षा असते.

मनोरंजन करने हा तर T.R.P. वाढविण्याचा सर्वात महत्त्वपूर्ण स्त्रोत मिडीयाचा समजला जातो. काही वर्तमानपत्रे , नियतकालिके, वाहिन्या फक्त जनसामान्यांचे मनोरंजन करण्याच्या दृष्टीकोनातून प्रसिद्ध केल्या जातात आणि त्यातूनच त्यांचा सर्वाधिक नफा मिळतो हे आपल्याला दिसून येत आहे.

मिडीया आपल्याला आज सर्वात जास्त पॉवरफुल असल्याचं दिसून येते. आपली भूमिका विवेकात्मक दृष्टीकोनातून मांडण्यासाठी तो सतत प्रयत्नशील असतो. या प्रयत्नांत पंजाब मधील 'तीतरसिंग बक्षी', शिवानी भटनागर अनुक्रमे (१९९२, १९९९) पासून तर यु.पी. मधील हेमंत यादव (२०१५) यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता सतत प्रयत्न करीत आहे. परंतु कोणत्याही एकाबाजूचा विचार करुन चालणार नाही आपल्याला मिडीयाच्या दुसऱ्या बाजुचाही विचार करावा लागेल.

मिडीया हा समाजाला स्पर्श करणारा एकमात्र सक्रीय घटक आहे. त्यामुळे समाज कशा पद्धतीने घडावा, कोणत्या दिशेने घडावा यांची जबाबदारी आज प्रसारमाध्यमांने स्वीकारली आहे. मिडीयातील काही वाहीन्या, वर्तमानपत्र या T.R.P. व पैश्यांच्या मागे धावतांना आपल्याला दिसत आहे. कोणती घटना कशा पद्धतीने लोकांपूढे किंवा समाजापुढे मांडावी जेणेकरुन समाजातील शवी खराब होणार नाही यांचा विचार मिडीया करत नाही तर आपली T.R.P. कशा पद्धतीने वाढेल या दृष्टीकोणातून विचार केला जातो.

मिडीया हा राजकारणात सक्रीय असतो व तो असायलाही पाहिजे. पण स्थिती वेगळी होत चालली आहे. काही वर्तमानपत्रे, वाहीन्या या पैशाला बळी पडल्या आहेत. नेते जसे त्यांना वागवितात तसे त्यांचे वर्तन असते. काही वर्तमानपत्रांवर तर त्यांच्या नेत्यांचा प्रभाव असतो त्यामुळे जनसामान्यांची दिशाभूल होतांना आपल्याला दिसत आहे.

मनोरंजनाचे साधन म्हणून मिडीयाकडे मोठ्या आशेने पाहिले जाते पण आज मनोरंजन कमी व अश्लीलता जास्त दाखविण्यात येतांना दिसत आहे. याचा परिणाम किशोरवयीन मुलां–मुलींवर मोठ्या प्रमाणात होत आहे. पुर्वी घरामध्ये टी.व्ही बघतांना सर्व कुटूंब एकत्र बसायचे व थोडे जरी अश्लील चित्रीकरण दाखविण्यात आली तर मुली उठून जायच्या किंवा ते चॅनल (वाहिनी) बदलविले जायचे. यावर आज जर अंकुश नाही लावण्यात आला तर परिस्थितीत बदल होईल ज्यात मुलं–पालक एकत्र बसून अश्लील चित्रे पहातील अशी परिस्थिती यायला वेळ लागणार नाही.

मिडीयाचे कर्तव्य समाजामध्ये जागृतता निर्माण करुन त्यांचा प्रसार करणे आहे. पण प्रसारमाध्यमे अशा कमकुवत घटकांकडे दुर्लक्ष करते. कधी कधी त्याकरीता त्यांवर दबाव असू शकतो याला दुमत नाही. परंतु कमकुवत घटकांकडे दुर्लक्ष होते की जाणुनबुजून (स्वतः) करतात हे ठामपणे सांगू शकतो.

आज संपूर्ण जग मिडीयाच्या जाळ्यात सापडलं आहे. ते सामाजिक माध्यम असो किंवा कोणतेही माध्यम त्यात तो

गुदमरल्यासारखां होतोय पण तो त्यात रमलाय. पलीकडे काय होत आहे. त्यांच्याशी त्याच काहीच लेणदेण नाही. असा समाज आज प्रसारमाध्यमांनी करुन सोडला आहे.

आजवर फक्त मिडीयामध्येच दोष आहे असंही नाही. प्रत्येक घटकाला दोन बाजू असतात यात दुमत नाही. पण कोणती बाजू आपण घेवून चालावी हे कोण ठरवेल हा प्रश्न? आज जवळपास ७५% मुलांच्या तळहातावर अश्लील चित्रीकरण आले आहे. याला जबाबदार कोण ? आपल्याला भारताची प्रगती कोणत्या दिशेने न्यायची ? हा प्रश्न? असे अनेक प्रश्न आहेत ज्याचे उत्तर कोण देणार हा सर्वात मोठा प्रश्न? कितीही प्रश्न पडत असले तरी किंवा कितीही दोष मिडीयात असले तरी त्यांचे आजच्या युगात असणारे महत्त्व , शक्ती कमी होत नाही. फक्त गरज आहे ती गुण व दोष यामध्ये संतुलन ठेवण्याची. मिडीयाला संविधानाने स्वातंत्र्य दिले आहे. त्या स्वातंत्र्याचा उपयोग सकारात्मक व्हावा अशी माझ्यासह जनसामान्यांची आशा. कारण आता प्रसारमाध्यमांनाच नवीन विचारांची पिढी घडवायची आहे.

**विक्की सा. गजभिये**

बी.ए. ३

# मैत्री

जीवनात खरे मित्र मिळणे फार कठीण असत पण दूर गेलेल्या मित्रांना विसरण काही सोपी नसत... खरच ना आपल्या मनात खूप दिवस जपलेला असतो तो जिव्हाळा... आणि अचानक समोर याव असंच तर घडतय कारण त्याचच तर नाव मैत्री असते. मैत्री, प्रेम आणि विश्वास निसर्गरुपी देणगी आहे.

हृदयाच्या रम्य मंदिरात...
भावनेच्या सुंदर वेलीवर...
सिंचन करणारं पुष्प म्हणजे मैत्री
मैत्री म्हणजे निरामय निरागस नातं...
मैत्री म्हणजे स्नेह बंधनाच्या धाग्याची गुंफण...
मैत्री म्हणजे मनाच हळूवार मिलन...
मैत्री म्हणजे फक्त मैत्रीच नसून
आपल जीवन फुलविणार एक यश असते...

अनेक थरावर थर साचवून फुलं जस आपल्यातले केशर साचवून ठेवतात तशीच मैत्री या पवित्र नात्यालाही जपणे तेवढच महत्त्वाचे असते.

जीवनाच्या पार्श्वभूमीवर सहानुभूतीच्या कुंचल्याने रेखाटलेल्या चित्राला मैत्री म्हणतात. खरोखरच या जीवनात यशस्वीपणे जगायचे असेल तर खऱ्या मित्राची गरज असते कारण चांगले मित्रच मार्गाला लावतात.

व्यक्ती कशी आहे हे त्यांच्या संगतीवरुन समजते. म्हणून म्हणतात मैत्री हे एक अशा झाडाचे फळ आहे ज्याची मधूर चव चाखल्यानंतर कळते. म्हणूनच सहवासात राहून मित्र कसा आहे हे ओळखता येते. मैत्रीला अशा एका किनाऱ्याची उपमा दिली आहे की ते दुःखाच्या किनाऱ्यापासून दूर नेते.

A true friends keep
a wake while you sleep
A friend whose person
he blooms the light in
the darkness.

मैत्री असावी नदीसारखी संथ प्रवाहात वाहणारी...

मैत्री असावी उथळ धबधब्यासारखी कोणत्याही मोहात खोल

शिरु न देणारी...
मैत्री असावी सुर्यासारखी सतत तळपत राहणारी...
मैत्री असावी चंद्रासारखी नेहमी शितलता देणारी....
मैत्री असावी समुद्रासारखी अथांग, विशाल, भारवणारी...
मैत्री असावी नदीसारखी अखंड तुडूंब वाहणारी...
मैत्री असावी झऱ्यासारखी निर्मळ झुळझुळ वाहणारी...
मैत्री असावी आरशासारखी आपलेच प्रतिबिंब दाखणारी...

शक्यतो हे कधी ना कधी संपणार असत, बहूतेक नद्या या आटून जातात पण मित्रत्वाच्या नदीत इतकी गोडी असते की शेवटी ती समुद्रासारखी वाढतच जाते. मित्रत्त्व हे प्रत्येकाच्या जीवनातील महत्त्वाचा घटक आहे. त्याच्याशिवाय आपल अस्तित्व कमीच आहे. कारण मित्र नसल्याने आपले जीवन भरकटलेल्या वाटसरुप्रमाणे असते त्याला मार्ग दिसतात पण कोणता मार्ग निवडावा हेही कळत नाही. जिवनात अनेक मित्र मिळतात पण त्यात एक दोन बोटावर मोजण्याइतकेच साथ देणारे असतात. जे एकमेकांच्या भावना समजून घेणारे असतात. सहाय्य करतात. वेळप्रसंगी आपल्या प्राणाचा त्यागसुद्धा करायला मागेपुढे पाहत नाही. तोच खरा मित्र. नाहीतर स्वार्थी दुनियेत मैत्रीच्या नावावर फक्त स्वतःचाच काहीजण स्वार्थ पाहतात. जे दुसऱ्याच्या सुखात सुख माननारे, दुःखात साथ देणारे असतात तोच खरा मित्र. अशांनाच परमेश्वर नेहमी आनंद देतो व सुखात ठेवतो. कारण ते स्वार्थी नसतात. महत्त्वाचे नसतं की नेहमी बोलावे, मनाची भाषा मनाला कळली की तीच खरी मैत्री.

मैत्री हे त्यागाचे आणि
विश्वासाचे बंधन असते
मांगल्याच लेण लेवून
निसर्गरुपी हृदयात अवतरलेल
एक वृंदावन असत...
मैत्री हा दोन मनाला जपणारा
प्रेमरुपी धागा आहे
मनातील अंतरंग पाहण्याचा
आरसा आहे...
मैत्री ही एक प्रेरणा आहे
विश्वास हा मैत्रीचा पाया आहे
खरा मित्र असावा आरशाप्रमाणे
समोर आल्यावर त्यात
आपलेच प्रतिबिंब दिसावे.

मैत्री ही विश्वासाच्या नाजूक रेशमी धाग्याला बांधलेली गाठ आहे
तुमच्याकडून मिळणारे प्रेमाचे शब्द हाच खरा मैत्रीचा वारसा आहे.

मैत्री ही कधी सांगून होत नाही. ती आपोआपच होते. मैत्री म्हणजे असे ठिकाण आहे जिथे आपण आपल्या मनातील विचार मनमोकळेपणाने सांगू शकतो. मैत्रीला वयाची, पात्रतेची अथवा सुंदरतेची गरज नसते. मैत्रीची तुलना कशाशीच होत नाही. ज्या मौल्यवान रत्नाची तुलना करता येत नाही ते म्हणजे मैत्री होय. त्याचे मोलच नाही म्हणून ते अनमोल आहे.

ज्याप्रमाणे तापत्या मातीला प्रतिक्षा
असते श्रावणाची...
चकोराला ओढ असते चंद्रकिरणे
प्राशन करण्याची....
तहानेलेल्या पाखरांना प्रतिक्षा
असते मृगसरीची...
कालींदीच्या श्यामल किनारी
जशी बावरी राधा प्रतिक्षा
करते नटखट कान्हाची...
त्याचप्रमाणे मीसुद्धा प्रतिक्षा
करते नेहमी खऱ्या मित्राची....!

**कु. पुजा हिरामणजी नारनवरे**
बी.ए. १

# भारतीय राष्ट्रवाद

''भारत देश विकसित होण्या जागृत असावा राष्ट्रवाद
देशवासी व नेत्यांमध्ये सकल वृत्तीचा जोपास
सोबत सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक
क्षेत्राचा व्हावा समतोल, उन्नत, सफल विकास.''

देशाचा विकास साधण्याहेतू सर्वप्रथम देशात राष्ट्रवाद किती प्रमाणात व कोणत्या दृष्टीने जोपासला जातो ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. कारण राष्ट्रवादाच्या विकासाला योग्य दिशा प्राप्त होण्यासाठी सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्राचा समतोल कसा राखला जाईल याकडे लक्ष देणे अनिवार्य ठरते. आपण विविध धर्मीय, विविध वंशीय, विविध प्रांतीय व विविध भाषिक लोक असलो तरी भारत या एकाच देशाचे नागरिक आहोत ही भावना रुजणे आजच्या काळाची गरज आहे. लोकशाही जीवनपद्धती आपण स्विकारलेली आहे म्हणून आपण आपल्या हक्कांबाबत जसे जागरुक आहोत तसेच इतर व्यक्तींच्या हक्कांबाबतही आपण आदर बाळगला पाहिजे. आपल्या हातून इतरांचे हक्क पायदळी तुडविले जाणार नाहीत याची काळजी आपण घेतली पाहिजे. परंतु आपल्याला आज समाजात याउलटच चित्र पहायला मिळते. उदा. – शेतकऱ्यांना मिळणारी सबसिडी त्याचा लाभ शेतकऱ्यांना कमी परंतु अमाप श्रीमंत असणाऱ्या लोकांना मिळतांना दितसो.

संपत्तीचे न्याय्य वाटप झाले नाही की आर्थिक विषमता निर्माण होते. समाजात एका बाजुला मुठभर लोकांच्या हाती संपत्ती एकवटलेली आहे तर दुसऱ्या बाजुला बहुसंख्य लोक दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहे. आर्थिक विषमतेमुळे पैशाला नको तेवढे महत्त्व प्राप्त झालेले आहे. आज पैसा मानवी जिवनाचे साधन न राहता साध्य झालेले आहे व त्यामुळेच व्यापाऱ्यांचा काळाबाजार, सत्ताधारी संबंधीतांची वशिलेबाजी, लाचलुचपत अशा वाममार्गाचा अवलंब होत आहे. त्यामुळे आर्थिक संघर्ष वाढत आहे त्यावर उपाययोजना अनिवार्य आहे. उदा. GST विधेयकाद्वारे संपूर्ण भारतात एकच करप्रणाली लागू होऊन आर्थिक समानता प्रस्थापित होण्यास मदत होईल व पर्यायाने राष्ट्रवाद निर्माण होण्यास हातभार लागेल.

आधुनिकीकरणाच्या या युगात आज प्रत्येक व्यक्ती आधुनिक जीवनाकडे वळू इच्छितो मग ही आधुनिकता धर्माबद्दल का असू नये? जुन्यापेक्षा वेगळे इतकाच अर्थ मर्यादित धरायचा का? की जुन्या व्यवस्थेत बदल अपेक्षित आहे? संकुचित वृत्तीमुळे व धार्मिक दुराग्रहामुळे समाजात कलह, दंगे, द्वेष वाढीस लागत आहे व याचा परिणाम राष्ट्रवादाला घातक आहे. उदा. – मशिदीवर मोठमोठे ध्वनिक्षेपक लावुन नमाज पढणे किंवा रस्त्यारस्त्यावर महाआरतीचे आयोजन, गणेश विसर्जनाची मिरवणुक त्यावेळी तणाव, दंगल व संघर्ष होतात त्यामुळे धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व पाळल्या जाण्याहेतू उपाययोजना महत्त्वाची आहे. यातून राष्ट्रवाद निमार्ण होण्यास मदत होईल.

''आम्ही मेंढर मेंढर ज्यानं याव हकालावं
पाच वर्षाच्या बोलीनं होतो आमचा लिलाव''

दर पाच वर्षानी निवडणुका होतात आणि आम्ही जनता या मेंढराप्रमाणे थोड्याश्या लाभाकरिता सत्य परिस्थितीचा मागोवा न घेता विकले जातो परंतु यातील किती आश्वासने पूर्ण केली जातात? योग्य सत्ताधारक निवडुन देणे जशी जनतेची जबाबदारी आहे त्याचप्रमाणे जनतेच्या आशा आकांक्षाचे जतन करणे ही सत्तारुढ पक्षाची जबाबदारी आहे ह विसरता कामा नये.

उदा. – काश्मीर मध्ये वेळोवेळी लावल्या जाणारी आणिबाणी यामुळे जनतेच्या अधिकारावर बंधने आकारली जातात. त्यामुळे जनतेच्या आकांक्षेला तडा जावुन पर्यायाने राष्ट्रवादास हानी पोहचते त्यामुळे देशात सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय घटकांत समतोल साधुन संकुचित राष्ट्रवादाची प्रतिके देशातून समुळ नष्ट करणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे देश प्रगतीपथाकडे वळतो. म्हणुन माझ्यामते,

''म्हणती यत्न हे मोतीचे कण, वेचावे होईल चंदन
चंदनमाळ फुलवित मन, देश उन्नती मौल्यवान धन
जोपासणे राष्ट्रवाद, राष्ट्रहित आपन,
देईल आंतरराष्ट्रीय आत्मसन्मान
विश्वशांती, विश्वगुणगान आनंदीआनंद जीवन,
घनश्याम मनमोहन.''

**कु. नैना बैस**
बी.ए. ३

# संघर्ष

''घरा बाहेरचं जग काय शिकवतं?'' एका ओळीचा हा प्रश्न. पण काय शिकवत नाही ते विचारा.......

उबदार घरट्यातून बाहेर पडावं आपल आकाश आपण शोधावं. ओळखावी आपल्या पंखातील ताकद असं मनापासून वाटतं...

मन आकाशात उडायला पण साद घालणाऱ्या आकाशात झेपावणं हे घरट्यात बसून वाटतं तितकं सोपं कधीच नसतं.

मी स्वतः शिक्षणासाठी बाहेर जाईल असा विचारही केला नव्हता पण माझ्या काकामुळेच ते शक्य झालं. त्यामुळे मी सर्वात आधी माझ्या काकांना धन्यवाद देते.

पण म्हणून घरटचं सोडायच नाही अस म्हणून कस चालेल? आपल्या पंखात बळं कमवायचं तर पंख कधी ना कधी फडफडाविच लागतात. स्वतःची किंमत चाचपडून पहावी लागते.

आईला सोडून कधी राहले नव्हते. पण वेळ अशी आली की मला वसतीगृहात ठेवण्याचा निर्णय घेतला. मला वाटतं, मी पहिली मुलगी असेल की जी शासकीय वस्तीगृहामध्ये नंबर लागतांना देवाला प्रार्थना करीत होती की माझा नंबर वसतीगृहात लागू देऊ नकोस, कारण माझे स्वप्न काही वेगळेच होते पण म्हणतात ना जे नशिबात असतं तेच घडतं...

आणि माझा नंबर काटोलच्या शासकीय वसतिगृहात लागला. शेवटी मला शासकीय वसतिगृहात ठेवण्याचा घरच्यांचा निर्णय पक्का झाला. इच्छा नसतांनाही मला तयार व्हावे लागले.

माझ स्वप्न माझ्याजवळच राहील व काकांचे स्वप्न पूर्ण करायला मी गेली... जसजसे दिवस जात गेले तसतसे मला कळत गेले की, खरचं.... घराबाहेरचे दिवस हे आपल्याला स्वतःची खरी ओळख देतात. आपल्याला जे हवं आहे ते मिळणार नाहीच, असे नक्कीच वाटायला लागतं. त्या बाहेरील दिवसात जर कोणी ओळखीचे दिसल तर भारतानं वर्ल्डकप जिंकल्याचा आनंद होतो.

लहान लहान गोष्टीचा आनंद व्हायला लागतो. ती या ''घराबाहेरच्या दिवसात'' म्हणून तर घराबाहेरचे दिवस आपल्याला आपली आणि घरच्या लोकांची खरी किंमत काय हे सांगतात. स्वतःची जबाबदारी आयुष्यात पहिल्यांदाच स्वतःच्या खांद्यावर येऊन पडते ती पेलन सुद्धा अवघड जातं.

घराबाहेरचे दिवस अशी नाती देतात काही सच्ची मैत्रीची आणि स्नेहाची यातच काही जिवाला जिव देणारे मित्र परिवार भेटतात. जेव्हा आपण इतरांसोबत आपलं सुख दुःख वाटून घेतो तेव्हा आपणही इतराचं सुख दुःख मनापासून आपलं मानतो व त्यात काही विपरीत घडलचं तर माणसं ओळखून चार द्यायला आणि दोन खायनाही शिकतो.

''देवा, मला इतकंच सुख दे की,
मला आयुष्यभरासाठी पुरेल,
माझी महती इतकीच असू दे की,
जी फक्त प्रेमाने निभावली जातील.
डोळ्यात इतकी लाज असू दे की,
थोरामोठ्यांचा मान राखला जाईल
आयुष्यासाठी श्वास इतकेच असू देत की...
कुणाच्यातरी आयुष्याचे भलं करता येतील;
बाकीचे आयुष्य तुझ्याकडेच ठेव
म्हणजे इतरांनाही माझं ओझं होणार नाही''

जेव्हा आपण घराबाहेर पडतो तेव्हाच आपल्याला जग काय आहे? ते कळतं.... शिक्षणासाठी बाहेर पडल्यानंतर कुणी रुम करुन राहतात तर कुणी हॉस्टेलवर.... माझ्या मते, जी मुलगी हॉस्टेलवर राहली आहे ती सासरी गेल्यावर लवकरच ॲडजेस्ट होऊ शकते. कारण होस्टेल म्हणजेच माझ्या मते, एक प्रकारच सासरच आहे. प्रत्येक गोष्ट ॲडजेस्ट करता करता वेळ काढायची.

माझ्या मते ॲडजेस्ट करणारीच मुलगी शेवटपर्यंत होस्टेलवर टिकून राहू शकते. आयुष्यात छोट्या छोट्या गोष्टींना किती महत्त्व असतं. सर्वात महत्त्वाचे म्हणजेच माझ्या मते शब्दच असतात. शब्दाचे खरे महत्त्व बाहेर गेल्यावरच कळू शकतं. कुठले शब्द वापरल्याने काय परिणाम होऊ शकतात हे बाहेर राहिल्यानंतर कळतं.

जिवनात एकदा तरी घर नाती सोडून बाहेर राहून बघावं... कारण अनुभव घेऊन खूप काही शिकायला मिळतं. त्याचबरोबर जिवनातलं एक कटू सत्य कळते ते म्हणजे माणूस हा नेहमीच एकटा असतो. आधार द्यायला आपली माणस नक्कीच असतात म्हणजेच आपली लढाई ही फक्त आपल्याशिवाय असते.

घरात आपण इतके दिवस कसे सेफ होतो. बाहेरच्या जगात होणारी दमछाक, प्रत्येक गोष्टीसाठी काहीतरी किंमत मोजावीच लागते. ह्या जगात काहीही फुकट मिळत नाही.

''शिक्षण आणि संस्कार
व्यापारा आधी व्यवहार''
आणि
''देवा आधी आई वडिलांना'' समजून घेतले
तर
जिवनात कोणतीच अडचण येणार नाही.

प्रत्येक व्यक्ती हा संघर्ष करुन जीवन जगत असतो. या जगात कोणी कितीही गरीब आणि कितीही श्रीमंत असला तरी त्याला कशाचे ना कशाचे टेन्शन असतेच. अंबानी एवढा श्रीमंत आहे म्हणून त्याला कशाचे टेन्शन नाही असे नाही आहे. जिथे माणूस तिथे भावना, सुख दुःख आणि संघर्ष असतो. फक्त गरज असेत ती म्हणजे लढण्याची आणि नवीन मार्ग काढण्याची. यालाच तर जीवन असे म्हणतात.

माझा अनुभव असा आहे की, ''एखादी व्यक्ती तुम्हाला खूप चांगली वाटली तर तुम्ही त्याच्यापेक्षाही चांगले आहात... कारण दुसऱ्यातला चांगलेपणा पाहण्याची नजर तुमच्याकडे आहे आणि दुसऱ्याला चांगलं म्हणण्याचा मोठेपणा तुमच्यामध्ये आहे...''

या विषयावर आणखी खूप लिहण्यासारखे आहे. लिहता लिहता पेज अपूर पडेल पण लिहणं संपणार नाही....

**कु. पायल सु. ठाकरे**
बी.कॉम. ३

# स्त्री पुरुष समानता काळाची गरज....

''स्त्रीला समाजात मिळणारे स्थान यावरुन देशाची व समाजाची प्रगती आणि संस्कृती दिसून येते.''

आपला भारत देश हा अनेक प्रकारच्या रुढी परंपरा आणि संस्कृतीने नटला व सजला आहे. पण या संस्कृतीचे किंवा परंपरेने स्त्रीला व पुरुषांना समान हक्क दिला का? असा प्रश्न जर कोणी केला तर त्याला एक उत्तर मिळेल ते म्हणजे 'नाही' कारण आपली संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती आहे. भारतीय संस्कृतीने स्त्रीला अगदी पूर्वीपासूनच अत्यंत महत्वाचे आदिशक्तीचे स्थान दिले आहेत.

भारतीयांनी स्त्रीला दिलेल्या या सर्वोच्च सन्मानावरून भारतीयांच्या सुसंस्कृतेचा जसा प्रत्यय येतो तसाच स्त्रीमधील सामर्थ्यांचा, शक्तीचाही साक्षात्कार घडतो. परंतु स्त्रीला असे देवत्व नको तर तिला हवे असते कुटुंबातील सन्मानाचे स्थान. समाजाकडून तुच्छता वाट्याला न येता मिळणारी समान वागणूक. पण आज परिपक्व व सुसंस्कृत प्रगत समाजातसुद्धा ''स्त्री पुरुष समानता'' खरचं आहे का? असा प्रश्न पडावा ही खेदाची गोष्ट आहे. खरं म्हणजे स्त्रीला अशी समानता मिळावी असेच तिचे सामर्थ्य जगाला ओरडून सांगतात.

यमधर्मालाही जिंकणारे सावित्रीचे बुद्धीसामर्थ्य, क्षमापुत्री सीतेची सहनशिलता, स्वतः डोळस असूनही पती अंध म्हणून आपल्या डोळ्यांवर पट्टी बांधणाऱ्या गांधारीचे त्यागसामर्थ्य, जिजाऊचे प्रेरकसामर्थ्य, संत जनाबाईचा भक्तीप्रवाह, झाशीच्या राणीचे रणसामर्थ्य, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंचे आत्मबल. अशा स्त्रीत्वाच्या अस्तित्वबळाचे मूर्तीमंत उदा. सिंधुताई सपकाळ... स्त्रीयांची ही तेजस्वी रुपे समाजाने अनुभवली आहेत.

राष्ट्राचे कणखर नेतृत्व माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी आणि माजी राष्ट्रपतीपदाची धुरा सांभाळणाऱ्या प्रतिभाताई पाटील यांचे नेतृत्वसामर्थ्य जगाला माहीत आहेत. भारतीय स्त्री सामर्थ्याचे याहून वेगळे उदाहरण आणखी कोणते हवे?

स्त्रीशक्तीचे हे दाखले ऐवढे विस्ताराने देण्याचे कारण एवढेच की, स्त्री-पुरुष समानता माननाऱ्या या आजच्या काळात स्त्रीला समानता दिली गेली पण ती पुरुष संस्कृतीचा, पुरुष

वर्चस्वाचा आब राखुनच. नजीकच्या भुतकाळात तर या पुरुषप्रधान संस्कृतिने स्त्रीयांचे तेजोवालय झाकोळूनच टाकले होते.

'स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत काळाची माता असते' अशा या उदात्त शब्दाचा मुलामा देऊन गृहलक्ष्मी या गोंडस अशा नावाखाली तिला उंबरठ्यात कोंडले गेले होते. न स्त्री स्वातंत्र्यमर्हती या तीन शब्दांच्या जादुचे, खरे म्हणजे पुरुषप्रधान संस्कृतीचे पारडे जड होऊन स्त्रीला दुय्यम नव्हे तर नगण्य स्थान दिले गेले म्हणूनच आज मानवाने स्वतःच तयार केलेल्या या संस्कृतीमध्ये स्त्रीयांबद्दल स्वतंत्र विचार करण्याची वेळ आली आहे. पुरुष म्हणजे माणूस हे अभिप्रेत, मग स्त्री सुद्धा माणूसच हे आवर्जून सांगण्याची वेळी का यावी ? कालांतराने उंबरठ्याची लक्ष्मणरेषा ओलांडून रुढी–परंपरेच्या चौकटीचा भेद करुन महात्मा फुले यांच्यासारख्याच आशीर्वादाने स्त्रीया बाहेर आल्या आणि फुलल्या, बहरल्या. प्रत्येक क्षेत्रात अगदी लोकसभेच्या सभागृहातीलच खुर्चीवर बसण्यापासून ते अंतराळात भरारी घेण्यापर्यंत आम्हीही काहीही करु शकतो हे स्त्रीने दाखवून दिले.

आधुनिक संस्कृतीमुळे स्त्रीयांचे जीवन हे बदलेले खरे पण या प्रगत संस्कृतीचा पदर व पदस्पर्श भारतासारख्या विशाल देशातील कष्टकरी आणि ग्रामीण स्त्रीयांच्या जीवनापर्यंत पोहचला नाही. रुढी परंपरांच्या घनाघाती आघातामुळे तेथील स्त्रीजीवन अजूनही बंदिस्तच आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे पुरुषप्रधान संस्कृती. या संस्कृतीचा समाजावर इतका भारी पगडा बसला आहे की, यातुन डोकेच बाहेर काढत नाही. स्त्रीला देवत्व देणाऱ्या संस्कृतीच्या या भारतात, स्त्री–पुरुष समानता हे नैतिक मूल्य म्हणून शाळेत शिकवावे लागते हा दुर्दैवीपणाच नव्हे का ?

जीवनसंसाराचा रथ निटपणे धावण्यासाठी स्त्री–पुरुषरुपी रथाची दोन्ही चाके सारखीच गतीशिल असायला हवीत. पण घराबाहेर समान कर्तृत्व गाजवणाऱ्या पती–पत्नीच्या भूमिका घरात येताच मात्र बदलतात. घरातील संपूर्ण जबाबदारी मग ते मुलांचे संगोपन असो, घरकाम असो किंवा कौटुंबिक नातेसंबंध जपणारा व्यवहार असो सर्व जबाबदारी स्त्रीचीच आहे व पुरुष मात्र केवळ कर्ता म्हणून सन्माननीय आहे. अशा भूमिका वाटल्या जातात. दोन्ही आघाड्या सांभाळायला लावून आपण स्त्रीची शारीरिक, मानसिक कुचंबना करत आहोत हे पुरुषांच्या गावीही नसते.

आज शहरात हे दृश्य पालटू लागले आहे. नव्या पिढीत 'संसार दोघांचा, दोघांनी मिळून सावरायचा' ही वृत्ती मूळ धरु लागली आहे. ही आनंदाची गोष्ट आहे. परंतु ग्रामीण भागात विशेषतः अशिक्षित कुटुंबातील स्त्रीच्या वाट्याला अवहेलना आणि 'स्त्री ही पायाची दासी' ही वृत्ती आपली पाळंमूळं अजूनही सोडायला तयार नाही. भारतीय लोकशाही, समाजवादी राज्यपद्धतीमध्ये स्त्रीयांचे हिताचे कायदेही समंत केले आहेतच. वडिलोपार्जीत मालमत्तेमध्ये मुलांप्रमाणेच मुलींनाही समान वाटा अशा सुरुक्षिततेपासून त्यांच्यावर होणाऱ्या सामाजिक अन्यायाविरुद्ध न्याय देणाऱ्या कायद्याची तरतुद केली आहे. तरीही महिलांवरील अन्यायाची व अत्याचाराची हुंडाबळी सारखी अनेक प्रकरणे नित्य घडतच असतात. त्याला उपाय म्हणजे पुरुषांची मानसिकता बदलायला हवी.

स्त्री पुरुष समानता आम्ही आणली आहे. अगदी राजकारणातही, असे पुरुषांनी म्हणावे उदा. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना मिळालेले आरक्षण. परंतु आम्ही म्हणतो राजमाता जिजाबाई, झाशीची राणी, अहिल्याबाई होळकर यांचे राजकारणसामर्थ्य इतिहास जाणतो. स्वतंत्र भारताच्या सुरुवातीच्या काळात सुचेता कृपालीनी, इंदिरा गांधी, सरोजनी नायडू व इतर आणखीही महिलांची कामगीरी समाज विसरला नाही. मग अशा समाजाकडून महिलांच्या सहभागासाठी आरक्षणाचे विधेयक मांडून का घ्यावे लागते? हे आरक्षण हक्क म्हणून का मिळाले नाही?

महिलांना शोभेची बाहुली मानणाऱ्या किंवा आजही ग्रामीण अशिक्षित स्त्रीयांना अगतिकता करणाऱ्या आणि अजाणत्या वयात झालेल्या भिषण अत्याचाराचा टाहो ऐकूनही निष्क्रीय राहणाऱ्या आजच्या समाजातील स्त्री–पुरुष समानता म्हणजे पुरुषांच्या हिताचे अहंकाराचे रक्षण करुन उरलेली म्हणून स्वीकारलेली अपरिहार्यता नव्हे का ? समान हक्काच्या काळातही महिलांच्या सहभागाला थोड्याफार नैसर्गिक मर्यादा आहेत हे समाजाने स्विकारले पाहीजे. तिच्यावरील जनन, अपत्य संगोपन, जबाबदाऱ्याची उपेक्षा न करता त्यातूनही ती गाजवत असलेले कर्तृत्व पुरुषांनी मान्य करायला हवे, संसाराचा हा प्रवास अडखळत, ठेचकळत, विसंवादी न होता सुयोग्यपणे गतिमान व नीटपणे होण्यासाठी संसारात स्त्री–पुरुष समाज फक्त कागदावर लिहण्यापूरते मर्यादीत न राहता व्यवहारात त्याची प्रचीती आली तरच आपला समाज पर्यायाने आपला देश प्रगतीपथावर मार्गक्रमण करीत राहील.

केवळ पुरुष सामर्थ्य दाखवून काही बाबतीत स्त्रीयांच्या असाहायतेचा, शारिरीक दुर्बलतेचा व नैसर्गिक प्रकृती धर्माचा आधार घेऊन स्त्रीयांना कमी लेखण्याचे दिवस आता संपलेले आहेत. स्त्रीयांनीही आपला न्याय हक्कासाठी पुढे खंबीरपणे सरसावलेच पाहीजे. भारतीय संस्कृती, परंपरा व कुटुंबव्यवस्था सांभाळून स्त्रीने निर्धार करुन आपले हक्क जतन केले पाहिजेत. जीवन व्यवहार सुरळीतपणे चालण्यासाठी कुटुंबव्यवस्था अधिक मजबुत होण्यासाठी प्रत्येक क्षेत्रात स्त्री–पुरुष समानतेचे तत्व सर्वांनी स्वीकारणे व त्याचप्रमाणे हे खरं म्हणजे पुरुषहीताचे, समाजहीताचे व राष्ट्रहिताचे नव्हे काय?

याकरिता अर्थातचे स्त्रीयांनाही हे करायला हवे !

''विश्वाची मी प्रतिभा, मजमध्ये समृद्धी वसे
संस्कृती जणू मी समूर्त, स्त्री हे माझे नाव असे!''

आपल्या संस्कृतीने किंवा आपल्या समाजाने स्त्री व पुरुष यांना कधीही एकसारखी वागणूक किंवा समानता दिलेली नाही. म्हणून आज आपल्या समाजात बहुतेक घटना ह्या विषयावरच्याच दिसतात. हुंडाबळी, अत्याचार थांबवायचा असेल तर स्त्री – पुरुष समानता आपल्या समाजाने मान्य करायला हवी. ही काळाची गरज आहे आणि जर स्त्री–पुरुष यांच्यात समानता आली नाही तर आपला समाज हा बेशिस्त होऊन जाईल. त्या समाजात स्त्रीयांचे जगणे हे अवघड होईल. आज जर शहरी भाग वगळला तर आपल्याला स्त्रीचा ह्या फक्त घरचेच काम करतांना दिसतात. त्यांना पुरेसे शिक्षण दिल्या जात नाही, त्यांना बाह्य जग काय असते हे ठाऊक नाही आणि असा समाज खरच प्रगती करु शकतो का ? या सृष्टीत स्त्री आणि पुरुष यांना घडवले आहे. आणि जर निर्मात्यानेच जर त्यांच्यात काही फरक केला नाही तर हा समाज असा फरक का करत आहे?

समाजाने अजूनपर्यंत स्त्रीचे महत्त्व जाणवले नाही ज्या स्त्रीने मराठ्यांचा राजा शिवाजी यांना घडविले ज्या स्त्रीने महापुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर सारख्या महान व्यक्तीला जन्मास घातले. आज त्याच स्त्रीला या समाजाने दुय्यम स्थानावर नेले. म्हणूनच स्त्री पुरुष समानता ही आजच्या युगात काळाची गरज घेऊन बसलेली आहे.

**कु. डिना मनोहर धुर्वे**

बी.ए. ३

# माझा अपराध काय?

यात एका जन्माला न येणाऱ्या मुलीच्या काय अपेक्षा आहे तिला जन्माला का येऊ देत नाही यावर तिने तिच्या आईवडिलांवर प्रश्नांचा मारा केला आहे. तिला जगण्याची खुप आवड आहे तिला हे जगं बघायच आहे शिकुन मोठं व्हायच आहे. म्हणून ती म्हणत आहे की मला पोटात मारु नका मला जन्म द्या ह्या सर्व अपेक्षा त्या जन्माला न येणाऱ्या मुलीची आहे.

मी कोण ? आणि माझं जीवन हे दुसऱ्यावर निर्भय का आहे मी माझं जीवन स्वतः का जगू शकत नाही. सर्व हक्क आणि स्वातंत्र्य हे मुलांनाच का आहे. मुलींना का नाही? आम्ही काय अपराध केला की आम्हाला ही शिक्षा दिली जात आहे का मला या जगात येण्या आधीच आईच्या पोटात मारल्या जाते का बरं मला हे सुंदर जग बघण्याचे स्वातंत्र्य नाही. मी एक मुलगी आहे. हा माझा दोष आहे काय? की मी एक मुलगी आहे म्हणून तुला माझा भार होत आहे काय गं. मुलगी होणं काय ऐवढा मोठा गुन्हा आहे एक मुलगी मुलाप्रमाणे जगू शकत नाही काय? तीला शिक्षण घेण्याचे आणि जगण्याचे स्वातंत्र्य नाही काय. मला पण या जगात येऊन मोकळा श्वास घ्यायचा आहे खुलुन जगायचं आहे. मला हे सुंदर जगं बघायचे आहे. काय मी यासाठी पात्र नाही काय?

''पंख मला द्या तुम्ही,
उंच भरारी घेईल मी।
काय तो दोषांचा वारा,
संपवून टाकीन मी।''
मुलींना जन्माला घाला तर मग समजाल तुम्ही
खूप भाग्यवान आहोत आम्ही ।
हे जगाला दाखवून
समजावून सांगाल तुम्ही ।।

आई गं तु मला पोटातच मारते तेव्हा तुला वाईट वाटतं नाही काय गं काय मी मुलगी आहे म्हणून माझी काय चुक, तुलाही मी आवडत नाही म्हणून तुम्ही मला पोटातच मारता, आई तु पण तर कोणाची मुलगी आहे, बाबा पण कोणाचे तरी मुलगा आहे. मग मीच काय केल की मला जन्म देत नाही.

तुम्ही भित आहे काय की या जगात मुलीवर खुप अन्याय, अत्याचार होत आहे. अनेक प्रकारचे कृत्य मुलींवर होत आहे म्हणून तुम्ही मला जन्म द्यायला भित आहे. काय तुम्हाला

अस वाटत असेल की माझ्याही मुलीसोबत अस काही घडेल काय? पण मी अस काहीच नाही करणार की तुम्हाला माझ्या जन्माला आल्याचे दुःख होईल. म्हणून मी कधीही तुमचे मन दुखविणार नाही पण जन्माला येऊ द्या.

काय गुन्हा आमचा,
आम्हांवर हा अत्याचार।
का खुलून जगू देत नाही,
हे जग आम्हाला।।

तुम्ही मला जन्म देता पण मला दुसऱ्यांच्या घरी जावं लागते. मग तर तुम्ही मुलांपेक्षा मुलींवर जास्त प्रेम करायला पाहिजे. कारण मुलं हे नेहमी तुमच्या सोबत असतात. पण मुलींना तर आपल्या आई–वडीलांचे घर सोडून लग्न करुन जावं लागते मग मुलींचा हा राग कसला.

पाखराप्रमाणे असतात मुली पण...
पण त्यांना पंख राहत नाही...
आई–वडिलांचे घर पण असते...
सासर पण असते पण ते ही
घर राहत नाही त्यांच
आई–वडिल म्हणतात मुलीतर
दुसऱ्यांचा घरच्या असतात
सासरचे लोक म्हणतात
ही दुसऱ्यांच्या घरुन आलेली आहे
मग देवा तुच सांग आम्ही
मुली कोणत्या घरासाठी आहो?....

काय मुली मुलांप्रमाणे शिकू शकत नाही का? त्यांना स्वतंत्र्यपणे जगू देत नाही. मुलींना आजही तुच्छ मानले जाते. मुलांप्रमाणे त्यांना खुलून जगण्याचे स्वातंत्र्य का नाही? काय एक मुलगी एका मुलाप्रमाणे का जगू शकत नाही? आजच्या जगात मुलापेक्षा मुलीं सर्व बाबतीमध्ये पुढे आहे. तर आजच्या या जगात गर्भहत्या का होते? का मुलींना जन्माला येऊ देत नाही ? मुलींकडे दोषाच्या रुपाने बघण्यापेक्षा प्रेमाने बघा आणि प्रेमाने जगू द्या.

गर्भहत्या टाळा मुलींना जगू द्या. मुलांप्रमाणे मुलींनाही जगण्याचा तेवढाच अधिकार आहे.

**कु. डिम्पल क. रक्षित**

बी.ए. ३

# पहिला स्वातंत्र्य संग्राम

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाला महाकाव्याची भव्यता आहे. अनेकांचे त्याग, श्रम, दुःख यातुन आपल्या देशाचा आत्मसन्मान त्यात आग्रहपूर्वक राखला गेला. भूतकाळात आपल्या देशावर अशोकसारख्या राजांनी राज्य केले. दक्षिणेत चोल राजाचे राज्य होते, तर १५ व्या शतकात अकबर व महाराष्ट्रात १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महारांजासारखे राजे होऊन गेले.

असे असले तरी ख्रिस्तपूर्व ४ थ्या शतकापासून ख्रिस्तोत्तर १८ व्या शतकापर्यंत भारतीयांनी परकीय आक्रमणासमोर देशाचा बचाव करण्यासाठी एकत्रितपणे पाऊल उचल्याचे दिसत नाही. या आक्रमकांमध्ये त्यांनी ग्रीक, पर्शियन, हुण, अफगाण व इतर होते. भारतीय राजांवर जय मिळविल्यावर त्यांनी लोकांची कत्तल केली. प्रचंड संपत्ती लुटली व आपल्या घरी ते परत गेले. मोगल या भटक्या जमातींचा मुख्य बाबर मात्र विजयानंतर इथेच राहिला व त्याने दिल्लीच्या आसपास आपले राज्य स्थापन केले. या मोगल शासनाच्या प्रदीर्घ काळात औरंगजेबसारखे जुलमी शासक झाले व त्यांनी काही लोकांचे इस्लाम धर्मात सक्तीने धर्मांतर कले. तरीही मोगलांनी या देशाची सामाजिक– आर्थिक रचना बदलली नाही असे म्हणता येते. इथल्या संरचनेचे ते भाग बनले. या विरुद्ध नेमके घडले ते ब्रिटीशांच्या विजयानंतर. या आधीची आक्रमणे व ब्रिटीशांचा भारतावरील विजय व त्यांची सत्ता यांत महत्त्वाचे अंतर होते.

भारतात १७ व्या शतकांत ब्रिटीशांची ईस्ट इंडिया कंपनी आली. तेव्हा तिने अगदी मवाळ भूमिका घेतली होती. ब्रिटीशांनी आपले स्वातंत्र्य अस्तित्व, अस्मिता पृथक ठेवली होती. भारतीय व्यापाऱ्यांना ते आपले विरोधक मानीत होते. १८ व्या शतकात अखेरच्या भारतात राजकीय एकात्मता नव्हती. वेगवेगळ्या भागात वेगवेगळे राजे राज्य करीत होते. त्यांना त्यांच्या सरदारांची व जमीनदारांची मदत असायची. यातून एक पुरोगामी व वैभवशाली सामाजिक आर्थिक रचना सिद्ध झाली होती. अन्नधान्याचे भरपूर उत्पादन होत असे. विणकर रेशीम व

कापडाच्या धाग्याची वस्त्रे विणत असत. ती आशिया मधल्या देशांत व युरोपातही पाठविली जात. १७४४ मध्ये भारताने इंग्लंडला ७ लाख पौंडाची निर्यात केली. पण इंग्लंडमधल्या औद्योगिक क्रांतीनंतर तिथल्या व्यापाऱ्यांना अधिकाधिक बाजारपेठांची गरज भासू लागली. ईस्ट इंडिया कंपनी आपले बस्तान बसवून सर्वत्र आपले व्यापाराचे जाळे पसरीत होती. त्या कंपनीच्या लक्षात आले की, राजकिय सत्ता स्थापन केल्याने स्थानिक व्यापाऱ्यांवर मात करता येईल. मग साम, दाम, दंड भेद या सर्व मार्गाचा त्यांनी आपल्या राक्षसी महत्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी वापर केला. जिथे ते मजबूत नव्हते तिथे त्यांनी मिळतेजुळते घ्यायची, सामोपचाराची भूमिका घेतली. जिथे शक्य तिथे त्यांनी पैशाचा व ताकदीचा वापर केला. एखाद्या प्रदेशात ते स्थिरावले की त्यांनी एका सत्ताधिशाला दुसऱ्या सत्ताधिशाविरुद्ध खेळवण्याचा उद्योग केला. आपले सामर्थ्य वापरुन त्यांनी कारागिरांचे व विशेषतः विणकरांचे खच्चीकरण केले.

**कु. प्रियंका आ. गायकवाड**

एम.ए. (इतिहास) २

# आता तरी जागे व्हा

आजच्या आधुनिक जगात सगळे काही इतक्या झपाट्याने बदलत चालले आहे की, त्याची कल्पनाही करणे शक्य नाही. आज आपली मनस्थितीही काल्पनिक वातावरणात परावर्तीत होत आहे. आपले प्रमुख असे दोन महत्त्वाचे सण 'गणराज्य दिन' आणि 'प्रजासत्ताक दिन' पण आपण हे दोनच सण सणासारखे साजरे करीत नाही. ज्या दिवशी आपल्याला स्वातंत्र्य मिळाले फक्त त्याच दिवशी आपण आपला देश आपली देशभक्ती प्रकट करतो. बाकी वर्षाच्या ३६३ दिवस आपण देश आणि आपली देशभक्ती विसरुन जातो. त्याच दिवशी आपण मोठी मोठी भाषणे आणि भक्तीगीत म्हणतो, मग सगळे काही विसरुन जातो. देव दिसत नाही तरिही त्याची रात्रंदिवस भक्ती व पूजा करतो. तो प्राप्त होईल की नाही माहिती नसतानांही त्याच्याच नावाची माळ जपतो. पण अनेक लोकांच्या बलीदानाने हा भारत देश आपल्याला मिळाला आहे, मग हा देश दिसत असूनही आपण त्याला पूजत नाही ही अतिशय दुःखाची बाब आहे. आपला देश तर दूरच आपण साधे आपल्या आई-बाबांनाही पूजत नाही. ज्यानी आपल्याला जन्म दिला, लहानाचे मोठे केले, इतके शिकविले, मोठे केले आज त्यांच्यासोबत चालतांना आपल्याला समाधानकारक वाटत नाही. बालपणी रडून-रडून ज्यांच्या मागे शेतात व बाजारात जाण्यासाठी लागत होतो आता त्यांच्यासोबत राहणेही आवडत नाही, ज्या माऊलीच्या हातची भाकर अमृतासारखी गोड वाटत होती ती आता गळ्यातून खाली उतरत नाही. आज हॉटेलचे जेवण आणि डझनभर मित्रांचा सहवास हे आपल्याला गर्वाचे वाटते. 'आई' ला 'आई' म्हणण्यात बाबांना चार चौघांत नेण्यात शरम वाटते तर मग आपण कसे आपल्या भारताला जपू शकू? त्याला कसे विकसित करु शकू? जर खरचं सण साजरा करायचा असेल, होळी, दिवाळी साजरी करायची असेल तर ती 'गणराज्य' व 'प्रजासत्ताक' दिनी साजरी करा. जर मनापासून देवाला पूजायचं असेल तर भारत भूमिला पूजा, जर खरंच देव प्रसन्न करायचा असेल तर आई-बाबांना प्रसन्न करा. तरच आपली भक्ती आणि शक्ती साकार होईल.

**कु. भूमी आर. चौरे**

बी.कॉम. २

# भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम

देशाचे उज्ज्वल भविष्य, येणाऱ्या पिढ्यांवर अवलंबून आहे. मुलापासून मोठ्यापर्यंत सर्वांनाच एकविसाव्या शतकात उज्वल भविष्याचे स्वप्न पूर्ण करण्याचे प्रेरणा देणारे भारताचे सर्वात लाडके राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या निधनामुळे संपूर्ण जगभरातून हळहळ व्यक्त होत आहे. त्यांनी शेवटपर्यंत ज्ञानदानाचे कार्य केले. ते खऱ्या अर्थाने आधुनिक ऋषीच होते. डॉ. कलाम विज्ञानाचे परमभोक्ते होते. देशाला महासत्ता बनविण्याचा त्यांचा मानस होता.

तामिळनाडू राज्यातील रामेश्वर येथे १५ ऑक्टोंबर १९३१ रोजी जन्म झाला. डॉ. कलाम यांचे पूर्ण नाव अब्दुल पकिर जैनुलाबद्दीन कलाम असे होते. वडील जनुलाबुद्दीन रामेश्वराला येणाऱ्या यात्रेकरुंची होडीतून धनुढ्यकोंडीला ने–आण करीत. आई आशिअम्मा म्हणजे ममतेचा, वात्सल्याचा एक विशाल सागरच. त्यांचे बालपण सुरक्षित, सुखाचे व भावनिक ओलाव्याने समृद्ध असे होते.

या रामेश्वरामध्ये हिंदू व मुस्लीम कुटुंबे गुण्यागोविंदाने एकत्र राहत असत. पवित्र असे शिवमंदीर त्यांच्या घरापासून अगदी दहा मिनिटांच्या रस्त्यावर होते. अशाप्रकारे लहानपणी आईवडीलांचे आदर्श, संस्कार त्यांना प्राप्त झाले. प्रत्येकात एक दैवी प्रकाशाची ज्योत असते. तीच आपलाल्या अंधारातून प्रकाशाकडे जाण्यास मार्ग दाखविते.

कलाम यांनी बालपणी वृत्तपत्र वितरण करण्याचे काम सुद्धा केले. त्यांचे बालपणीचे मित्र रामनाथा हा पुजारी बनला. कलामांना विज्ञानाविषयी खुपच आवड होती. ते पुढे शास्त्रज्ञ बनले. व भारताचे राष्ट्रपती झाले. कलामांना तीव्र इच्छा होती की, आपण जरी मध्यमवर्गीय कुटुंबातील असलो तरी आपण अभ्यास व प्रयत्न यामुळे जीवनात यश मिळवू शकतो. अभ्यास करतांना ते भूक, तहान, झोप विसरुन जात.

''प्रयत्ने वाळुचे कण रगडता तेलही गळे'' अशी सुंदर म्हण आहे. ती कलामांना लागू होते. बी.एससी. नंतर भौतिकशास्त्र हा विषय घेवून पुढे एम.एससी. व्हायच की, अभियांत्रीकीकडे जायचे व कृतीशिलतेला प्राधान्य देऊन इंजिनिअर व्हायचे हा विचार त्यांच्यासमोर पडला. तेव्हा त्यांनी योग्य मार्गदर्शन घेतले. व पुढे दक्षिण भारतातील मद्रास इंस्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी (Institute of Technology) येथे प्रवेश घेतला.

पुढे अमेरिकेतून परत आल्यावर त्यांनी थुंबा येथे रोहिणी व मेनका ही रॉकेटस बनविण्यासाठी बरीच मदत केली. २० नोव्हेंबर १९६७ साली रोहिणी या उपग्रहाचे यशस्वी उडाण कलाम व त्यांच्या सहकार्यांच्या कामाची पावतीच होती.

पुढे (Indian Space Research Organization) ज्याला 'इस्त्रो' असे म्हणतात. मुलांना ते उपदेश करीत व सांगत की जीवनात तीन सामाजिक व्यक्ती महत्त्वाच्या आहेत. त्यामध्ये आई, वडील, शिक्षक. कलामांना अनेक पुरस्कार मिळाले. सर्वात मोठा पुरस्कार 'भारतरत्न' हा भारत सरकारतर्फे देण्यात आला. सर्वाच्चपदी भारताचे राष्ट्रपती म्हणून त्यांची निवड झाली.

''थोर महात्मे होऊन गेले,  
चरित्र त्यांचे पहा जरा  
आपण त्यांच्या समान व्हावे  
हाच सापडे बोध खरा''

**कु. भावना कि. चाफेकर**  
एम.ए. २ (इतिहास)

# आई होती म्हणून

आई धन्य आहे ग मी
कि तुझ्या पोटी जन्माला आले,
सर्वांनी मला दुरावले,
पण तू मला जवळ केले.

मुलगा हाच वंशाचा दिवा
म्हणून सर्व वागलेत,
तू साथ दिली मुलीला
म्हणून मी जगली.

वडिलांनी तिला दुरावले
पण त्या माऊलिने जवळ केले
जाती, धर्म, पंथ भेद
या सर्वांना तिने सोडले.

मूलगा-मुलगी एक समान
या आशेत ती वागली
आशेलाही पंख मिळावे,
म्हणून रात्र-दिस ती झटली.

होता तो आत्मविश्वासाचा दिवा
ज्योत त्यात आईने लावली
मुलीलाही-मूलासमान वागवा
ही आशा तिने दाखविली.

होती ती अडाणी जरी
पण काम तिने महान केले
म्हणून म्हणते आईच्या
श्रेष्ठत्वाची
जागा कोणी नाही घेतली.

**कु. श्रद्धा वा. बोंडे**
बी.कॉम १ (मराठी)

# माझे बाबा

बाबा मला तुमचे स्वप्न पूर्ण करायचे आहे
त्यासाठी मला फक्त तुमचा आशिर्वाद हवा आहे
फक्त तुमचा आशिर्वाद... ।।१।।

मला माहित आहे तुम्ही माझ्या शिक्षणासाठी
केला संघर्ष
मला उंच भरारी घेण्यासाठी तुम्ही घेतले कष्ट
मला तुमची साथ हवी आहे, तुमच्याशिवाय
शुन्य आहे माझे जीवन
बाबा मला फक्त आशिर्वाद.... ।।२।।

तुम्ही माझ्यासाठी केले अनवाणी शेतामध्ये कष्ट
तुम्ही केला माझ्यासाठी, लोकांशी संघर्ष
तुम्ही माझ्या शिक्षणासाठी, घेतले जिवनभर कष्ट
आता माझी पाळी आली, तुम्हाला सुख देण्याची
त्यासाठी बाबा मला फक्त आशिर्वाद...।।३।।

मुलगी असुनही, तुम्ही केला गर्व
मुलापेक्षा मुलगी असते कमी,
असे तुम्ही कधी म्हणाले नाही
एक दिवस भरारी घेशील,
उंच गगनाला स्पर्श करशील
माझे स्वप्न पूर्ण करशील, दुःखा ऐवजी सुख
माझ्या जिवनात आणशील असे तुम्ही म्हणाले
त्यासाठी मला फक्त आशिर्वाद.... ।।४।।

**कु. जया दि. कोल्हे**
बी.कॉम. २

# एकदा

एकदा त्याने यायचे कबूल केले
अन् मी वाट पाहत बसले
सवयी प्रमाणे त्याने तेच केले
मलाही नेहमी प्रमाणे रागच आला

एकदा त्याने निरोप दिला
म्हणाला, पहा मी येणारच
वाऱ्याने पळवून नेलेली छत्री
मी पाहातच बसली....

आता बघच तू मी आलोच
अन पाहता पाहता बरसला
ओलेचिंब करुन गेला
म्हणाला, भावला का स्पर्श तुला

अन छत्री हातात असतांना
मला जमले असते का हे सर्व
त्या शब्दांनी आनंदाच्या भरात
बहरुन गेले सर्वांग

म्हटले 'एकदा' परत ये
काळ्या मातीच्या दारात
तुझ्यामुळे सुख येईल
शेतकऱ्याच्या मळ्यात

हिरव्यागार गालीच्याने
स्वागत करील तुझे
काळी असली तरी
नाते जन्मोजन्मीचे...

निखील र. कडू
एम.कॉम. २

# स्वाभिमान

कुठवर पत्करायची लाचारी
स्वाभिमानाने जगायला शिक
कुठवर पुरेल बापाची कमाई
जरा घाम गाळायला शिक.

मनगट दिले असतांनाही
मागायची का भिक
मराठी बाणा छातीवरती
घेऊन जगायला शिक

लाज शर्मेचे गाठोडे घेऊन
रस्ता सापडणार कसा
झुगारुन दे सीमा आता
नेतृत्व हाती घ्यायला शिक

जन्मलास मराठी मातीत
अस्तित्व जगण्यास शिक
पराक्रमाचा दाखवायला
मैदानात उतरायला शिक.

कु. अक्षता खरबडे
बी.कॉम. १

# मी शेतात राबतो आहे

मनातल्या दुःखांना
मी मनातच दाबतो आहे
पर्वा न करता जिवाची
मी शेतात राबतो आहे
उदयातरी मिळेल सुख
या आशेवर मी जगतो आहे
स्वतःशीच मी आज
परक्यासारखा वागतो आहे
मुलाबाळांना हसविण्यासाठी मी
स्वतःच्या स्वप्नांना त्यागतो आहे
हिरवेगार होईल शेत माझे
म्हणून मी दिवसरात्र राबतो आहे
चेहऱ्यावर हसू येण्याची भीक
मी देवास मागतो आहे
भुकेली माझी लेकरे
त्यांच्यासाठी दाणा मी टिपतो आहे
दुःखाने बरबटलो असतानाही
मी सुखाला स्पर्श करतो आहे
शरीर जिवंत असतानाही
मी रोज मरतो आहे
टाकूनि जीव धोक्यात मी
सुखासाठी धडपडतो आहे
अशा वेदनेच्या पुरात
मी राबतो आहे
मी राबतो आहे.

कु. शितल चं. गाडरे

बीबीए १

# कथा तिच्या जिवनाची

मुलगी असली तरीही
स्वप्न मात्र अनेक आहेत
अनेक दुःखानी वेढलेल
असं तिच जगण आहे.

अयशस्वी झाली एकदा तरी
संधी मात्र देत नाहीत
तिचं मन तिच्या भावना
समजून कुणीच घेत नाही

आई-वडिलांना सुद्धा
मुलगीच जड असते
कठोर दगडाचा तो
त्यांच्यासाठी गड असते.

शिक्षीत असलं जग तरी
हुंड्यांला ती बळी पडते
कुणाची सून किंवा पत्नी
म्हणून तीच तर छळली जाते.

पण कितीही दुःख झाले तरी
ती सगळं सहन करते
सुख आपल्यालाही मिळेल
कधीतरी म्हणून ती वाट पाहते.

कु. डिंपल प्र. गजभिये

बी.ए. २ अ

# मनात नसतांना

मनात नसतांना कुणाला
कधी-कधी दुखवावे लागते
उत्तर माहित नसलेल्या प्रश्नांना
कधी-कधी सामोरे जावे लागते
मनात नसतांना कुणाला
कधी-कधी फसवावे लागते
वाट माहित नसतांना वाटसरूला
वाटेल त्या मार्गाने जावे लागते
फांदीच्या मनात नसतांना
फुलाला डाहळीवरुन पाडावे लागते
अग्नीच्या मनात नसतांना शवाला
कधी-कधी जाळावे लागते
माणसाच्या मनात नसतांना
कधी-कधी जगातून जावे लागते
आणि माझ्या मनात नसतांना
मला माझ्या प्रिय व्यक्तीला सोडावे लागते.

**कु. संजिवनी ग. ढोरे**
एम.ए. २ (इतिहास)

# मैत्री

गुलाबाच्या फुलाला
मोगरा म्हणु नकोस
आहे तुझ्या नजरेपुढे
दुसरीकडे शोधु नकोस.

सौंदर्य कशाला बघते?
बघ माझ्या मनाकडे
प्रेम केले आहे मी
माझ्या प्राणापलीकडे

तृप्तीसाठी मिळेल पाणी
सुखी होण्यास लागेल समाधान
तुला ओळख कशी देऊ
काहीच नाही माझ्या मनात!

दुधासारख्या द्रवाला
ताकाची उपमा दिली
पळवाट काढायची होती
तर मैत्री कशाला केली?

**कु. माधुरी रा. वाघाडे**
बी.ए. २ ब

# आठवण

कळत, न कळत, केव्हा जुळलो आपण
कळत, न कळत, केव्हा मैत्रिण बनलो आपण
कळत, न कळत, केव्हा प्रेमाचं नात जोडल आपण
कळुनही हेच कळावे की जवळ-जवळ मैत्रिणच नव्हे
तर विश्वासु ही बनलो आपण....

पण वेगळ्या झाल्या जेव्हा वाटा
सलला तेव्हा मनात काटा
का वेगळ्या झालोत, आपण
व कसल्या वेगळ्या आपुल्या वाटा...

जीवनाची वाट दिसते तितकी सोपी नसते
अनुभव म्हणजे काय ? तेव्हाच कळते
पण जिवनाच्या वाटेवरुन जाताना मैत्रिच्या
अतुट नात्यांची आठवण मात्र नक्कीच येते...

जातांना काही आठवले
नकळत डोळ्यात पाणी आले
नकळत एक शेवटचा घेत श्वास आहे
शेवटी कितीही केले तरी
जीवन एक प्रवास आहे...


**कु. मनिषा अ. गायधने**
बी.कॉम. २


# मला सांगताच आले नाही...

मला सांगताच आले नाही
काही कुणाला मनातले
शब्द गुंफता आलेच नाही
भावनांच्या उरातले

आली आठवण पूर्वाधाची
नयनी दाटले लगेच अश्रु
जीवनातील ऋतु चक्रच माझ्या
मी तरी त्यांना कशी विसरु

होत्या अपेक्षा ज्यांच्याकडून
नाही घेतले त्यांनी जाणून
आसवांशी मग केली मैत्री
त्यांना सोबती स्वतःचा समजुन

उत्तरार्धात मग जीवनाच्या
वाटले सांगावी मनातील प्रीती
पण समजून घेणाऱ्या व्यक्तीची
भुमिका आता बदलत होती

शेवटी भावना मनातील
राहील्या तिथेच जपुन
फक्त आशेवर इतक्याच की
घेईल कुणीतरी समजुन...


**कु. सोनल हि. सकर्डे**
बी.ए.३

# निसर्ग

नव्या युगाचा नवा निसर्ग
आहे खुपच हिरवेगार
पशु-पक्षी प्राण्यांसोबत
करुया गंमत फार ।।

बिबटे, वाघं, हरिण, कोल्हे
सगळे आहे आपलेच मित्र
आज आपल्याच चुकीमुळे
फक्त बघतो त्यांची चित्र ।।

प्राण्यांची शिकार करुन
खातो आपणच मांस
आपल्या या हल्ल्यामुळे
होतो सर्वांच्या जिवनास त्रास ।।

आता तरी वृक्षतोड थांबवुन
वाढवु असंख्य प्राणी
निदान याच उपायामुळे
टाळु शकू ही मोठी हानी ।।

**रामलाल शं. गोयते**
बी.एससी. १

# माणसा

माणसा तु आहेस देणगी देवाची
तुझ्याकडे आहे शक्ति विचार करण्याची
सर्व ज्ञान आत्मसात करण्याची
तरी पण तु वागतोस अज्ञानी ।।१।।

माणसा तु आहे बुद्धिमान प्राणी
तरी पण वागतो बुद्धी नसल्यावाणी
तु एक जीव असुनसुद्धा
होतो दुसऱ्या जीवाचा जीव ।।२।।

माणसा तु माणुस असुनही
का ओळखत नाही दुसऱ्या माणसांना
का करतो त्यांचा खेळ
का नाही त्यांची परवा ।।३।।

माणसा तुला घडविले निसर्गाने
तरी काळजी नाही तुला त्याची
तुला जिवंत ठेवले निसर्गाने
तरी तू चाललास त्यास नष्ट करण्यासाठी ।।४।।

माणसा तू चाललास सृष्टी बदलवण्यास
तुला नाही दया निसर्गाची
माणसा तु किती स्वार्थी ।।५।।

**रोशनी रा. नासरे**
बी.कॉम. २

# बाप

आइचं गुणगान खूप झाले,
पण बिचाऱ्या बापाने काय केले.
बिकट प्रसंगी बापच सदा सोडवी
आपण फक्त गातो आईचीच गोडवी.

आईकडे असतील अश्रुंचे पाट,
तर बाप म्हणजे संयमाचा घाट.
आठवते जेवण करणारी प्रेमळ आई
त्या शिदोरीची सोय ही बापच पाही.

देवकी-यशोदेचं प्रेम मनात साठवा,
टोपलीतून बाळास नेणारा वासुदेवही आठवा.
रामासाठी कौशल्येची झाली असेल कसरत
पुत्र वियोगाने मरण पावला बाप दशरथ.

काटकसर करुन मुलास देतो पॉकेटमनी,
आपण मात्र वापरी शर्ट-प्यँट जुनी.
मुलीला हवे ब्युटीपार्लर, नवी साडी
घरी बाप आटपतो बिन साबणाची दाढी.

वयात आल्यावर मुले आपल्याच विश्वात मग्न,
मुलांच्या बापाला दिसे मुलांचे शिक्षण, पोरीचे लग्न.
मुलाच्या नोकरीसाठी जिना चढुन लागते धाप,
आठवा मुलीच्या स्थळासाठी उंबरठे झिजवणारा बाप.

जीवनभर मुलांच्या पाठी बापाच्या सदिच्छा,
त्यांना समजून घ्यावं हीच माफक इच्छा.

**कु. तेजस्वीनी बी. काठोले**
बी.बी.ए. १

# जीवन

कधी कधी जीवनात इतकं
बेधुंद व्हाव लागतं,
दुःखाचे काटे टोचतानाही
खळखळून हसावं लागतं
जीवन यालाच म्हणायचं
असत....
दुःख असुनही दाखवायचं
नसतं
डोळ्यांना पुसत आणखी
हसायचं असतं,
जीवन यालाच म्हणायचं
असतं.....
शब्दांचा आधार घेऊन जर
दुःख व्यक्त करता आले असते,
तर, कदाचित कधी अश्रुंची गरज
भासलीच नसती
आणि सर्वच जर शब्दात सांगता
आले असते,
तर भावनांना किंमत कधी
उरलीच नसती....
जीवनात असाध्य अशी
कोणतीच गोष्ट नाही
जर मनात इच्छा असली
तर माणूस आकाशाला
गवसणी घालू शकतो.
जीवन यालाच म्हणायचं
असतं......

**कु. स्वाती हे. शेंडे**
बी.कॉम. २

# सॉरी

सॉरी म्हणून सगळ संपत कारे रे पोरा ?
अरे आम्ही जीव टाकला होता तुझ्यावर ओवाळून
तु मात्र सॉरी म्हणून बसलास, मोलाचा जीव गमावून
संपतील का रे सारे प्रश्न सॉरी म्हणून ?

मोठी माणसं नेहमीच बोलतात
आजचे तरुण सगळंच कसं सहजपणे घेतात
कितीही मोठ्या चुकांसाठी फक्त सॉरी म्हणतात
पण, आत्महत्येसाखं पाप करतांनाही
फक्त सॉरीच म्हणतात का रे ?

सांग ना रे राजा, सॉरी म्हणशील तरी कशाकशाला?
आईनं तुला पाजलेल्या अमृतसमान दुधाला ?
की बाबांनी तुझ्या आजारपणात जागुन
काढलेल्या रात्रीला?
ताईन तुझ्या मनगटावर प्रेमाने बांधलेल्या राखीला ?
की दादाने पाठीवर हळुच दिलेल्या शाबासकिला ?

कसा विसरलास राजा -
आईनेच तुझ्या दुःखात दिला असता रे हात
बाबांनीच तुला शेवटपर्यंत दिली असती रे साथ
ताई-दादाच्या हळुवार शब्दांनी केली
असती तुझ्या संकटावर मात.
आता मात्र तू साऱ्यांचाच कसा केलास रे घात?

तुला कल्पना तरी आहे का राजा -
आईचं मन आता कणकण जळतय
बाबाचं ह्रदय आता तीळ-तीळ तुटतंय
ताईचे डोळे येत आहे, पुन्हा पुन्हा भरुन
अनं दादाचं डोक सुन्न होत आहे, विचार करुन करुन

एकटा कुढत बसलास,
आम्हाला सांगितल का नाहीस रे ?
मरण पत्करुन कोणी मोकळ होत का रे ?
वाटून घ्यायचे होते आम्हाला
दुःख आभाळाऐवढे तुझे!
मात्र ठेवून गेलास फक्त संकट अन् दुःखाचे ओझे!

जगणं म्हणजे राजा असतं तरी काय ?
अरे जगण्याचा असतो नेहमी दुःखाशीचं टाय
सामोरे जाऊनचं करावे लागते दुःखाला बाय
कस कळलं नाही राजा,
जीवन असत तरी काय?

अरे ऐकून घ्यावं लागत राजा जीवनाचं म्हणनं
गावं लागतं राजा, भर दुःखातही गाणं
गालितगात्र झालो तरी, चुकवावं लागत देणं
यालाचं म्हणतात राजा, खऱ्या पुरुषार्थाच जगणं
यालाच म्हणतात राजा, खऱ्या हिंमतीनं लढनं !

कु . रेणुका प्र. बाभुळकर
एम.ए. २ (इति.)

# आठवण

जीवनाच्या प्रत्येक क्षणी
मनात आठवण तुझीच आहे
तुच माझे जग, तुच माझा श्वास आहेस.

जसे ह्रदय शरीरासाठी तसेच
तू माझ्यासाठी खास आहे
जणू श्वासाचा जीवनाशी, असेच आपले नातं आहे

आठवणीने तुझ्या ह्रदय माझे भरुन येते
तुझ्या डोळ्यात पाहता पाहता
भानच मी विसरुन जाते

तू जवळ असल्यावर वाटते
आता कुणाची गरज नाही
तू दूर गेल्यावर मात्र मीच माझी राहत नाही.

तुझ्याविना जगणे आता कसे मला शक्य आहे
तुच माझा जीव, तुच माझा प्राण आहेस.

जिवनाच्या प्रत्येक पाऊलावर
आता गरज आहे तुझीच
कारण आता मी आहे तुझी फक्त तुझीच.

**किरण कमाले**
बी.एससी. ३

# मैत्री

मैत्री म्हणजे दोन जीवांना
जोडणारा पूल....
मैत्री म्हणजे वेलीवरचे
फूल.....
मैत्री म्हणजे संकटकाळी
मदतीचा हात....
मैत्री म्हणजे आभाळाला
पडलेले स्वप्न....
मैत्री म्हणजे शाबासकीची
पाठीवर थाप....
मैत्री म्हणजे आसवे
पुसणारा हात....
मैत्री म्हणजे आनंद
देणारा सागर....
मैत्री म्हणजे चुका
दाखविणारा आरसा....
मैत्री म्हणजे सुख-दुःखात
साथ देणारा सोबती....
मैत्री म्हणजे सुर्यासारखा चिरकाल
टिकणारा प्रकाश....
मैत्री म्हणजे आयुष्यभर
चालणारा श्वास....

**कु. ज्योती दि. देवतळे**
बी.ए.३

# धैर्य

नशिबाने साथ सोडली म्हणून
मरायचे नसते
स्वतःच्या हिंमतीवर
जगायचे असते
मागचे सारे काही आठवून
रडायचे नसते
भविष्याचा विचार करुन
जगायचे असते
शुल्लक संकटांना
घाबरायचे नसते.
एक ठेच लागली म्हणून
थांबायचे नसते
धैर्याने त्याच वाटेने
चालायचे असते
कर्तुत्वातूनच माणूस घडतो
हे लक्षात ठेवायचे असते.

कु. प्राची चुटके
एम.ए. २

# माझे प्रिय बाबा

जसे असावे आकाशात चांदणे,
तसे माझ्या बाबांचे बोलणे
अचानक कानावर आली बाबांची हाक
त्यांनीच शिकवलय, प्रत्येक गोष्टींवर निर्णय घ्यावा
बाबा म्हणजे सुखाचे क्षण
नसतात तेव्हा लागत नाही मन!
बाबा म्हणजे फुलातील सुगंध
त्यांनीच शिकवलंय, प्रत्येक गोष्टीत कसा घ्यावा आनंद!
बाबा माझे सर्वस्व, बाबांसाठी मी श्वास की प्राण
म्हणूनच तर आहेत ते माझ्यासाठी खास ।
बाबा, निसर्गासारखी आपली जोडी
द्याल तुम्ही मला कठीन परिस्थितीत प्रेमाची मिठी!
मी तर बनेन खूप खूप मोठी
पण, तुमच्यासाठी राहीन मी तुमचीच लाडकी !

चंचल दा. कुटे
बी.ए. १

# धैर्य

नशिबाने साथ सोडला म्हणून मरायचे नसते
मागचे सारे आठवून रडायचे नसते.
भविष्यात काय होईन हे आठवायचे नसते
आजचा विचार करुन जगायचे असते.
कर्तृत्वातून मानूस घडतो, हे महत्त्वाचे असते
शुल्लक संकटांना घाबरायचे नसते.
धैर्याने त्याच वाटेवर चालायचे असते
कोणी काय म्हणेन यावर घाबरायचे नसते.
विश्वासाने त्यावर मात करायची असते.
कुटुंबावर ओझ देऊन चालायचे नसते
आपण काही प्रयत्न करायचे असतात
हेच धैर्य आपल्या मनात असायला पाहिजे.

**करिश्मा पां. खापरे**
बी.ए. १

# आठवणींचे थवे

आजही सांग माझे भास
स्वप्नात तुला छळतात का ?
बोलायच्या गेल्या, राहुन ज्या
गोष्टी तुला कळतात का ?
एका वाटेचे दोन प्रवासी
घट्ट दाटली अगम्य निशा
चुकून तुझी पावले माझ्या
घराकडे वळतात का ?
धडधडती ह्दये अन्
श्रावणमासी मने पेटली
त्याच प्रीतीच्या ज्योती अजूनी
मनी तुझ्या जळतात का ?
साता जन्माची देऊन वचने
जपली प्राणांहून प्रीती
स्मरता ती प्रणयसंध्या
आसवे तुझी गळतात का ?
विसरलीस जशी मला
विसरेन तुलाही म्हणतो
आठवणींचे थवे तरीही
आकाशी तुझ्या पळतात का ?

**कु. हर्षा बोंदरे**
बी.कॉम. २

# मार्ग शिखर प्रगतीचा

ध्येय असावे दृष्टीस
दारे उघडतात आपोआप
मात्र अडचणी सदोदित
असतात पाठोपाठच

अडचणीवर करुन मात
सरकायचं पुढं असतं
नशिबाला दोष देवुन
स्वप्न मागे सारायचं नसतं

म्हणतात नशिब बलवान
तरि ही का ओढाताण
आहेत जरी अनेक मार्ग
एकच जीवन, विविध पैलू
त्याचे असतात अनेकार्य

जीवनातील गर्भीत अर्थ
आम्हालाच शोधायचा असतो
मावळता सूर्य उदयाची
नविन पहाट उजाळीत असतो

जसे दिवसाआड लपलेला चंद्र
अंधारात प्रकाशमान असतो
लुकलुकत्या ताऱ्यांमध्ये दिव्य तेज
अस्तित्व मात्र सखोल असतं

प्रयत्नांती यशाचा सागर
संथ कधिच नसतो
वाहत्या पाण्याच्या लाटा
मनात सखोल आत्मविश्वास
दृढ चेतना जागवून जातो

म्हणती यत्न हे मोत्यांचे कण
वेचावे होईल चंदन
चंदनमाळ फुलवित मन
यशोन्नती मौल्यवान धन
देईल आत्मसन्मान गाढ
आनंदी जीवन...
वसती हृदयी घनश्याम मनमोहन.

कु. नैना बैस
बी.ए. ३

# डोळ्यातील आसवांना...

डोळ्यातील आसवांना पुसावं लागतं
मनाला थोडं समजावं लागतं

आपल आयुष्य आपल्यालाच वेचावं लागतं
का असं जगाव लागतं?

येतांना रडावं लागतं, जातांनाही रडावं लागतं
मग, का असं मध्येच खोट हसावं लागतं
का असं जगावं लागतं?

कधी उन्हाने जळून तर कधी थंडीने
ओढून मराव लागतं
आपल सरण ही आपल्यालाच रचावं लागतं
का अस जगावं लागतं?

कु. संजिवनी ग. ढोरे
एम.ए. २ (इतिहास)

# हेच वय आहे

हेच वय आहे स्वतःला सिद्ध करायचं
खूप मोठं होण्याचे आणि
आपल्या पायावर उभ राहण्याचं...

हेच वय आहे आयुष्यात भरपूर आनंद लुटण्याचं
आणि आपल्या तारुण्याचा आनंद
लुटण्यात धुंद होण्याचं

हेच वय आहे आई-वडीलांच स्वप्न साकार कराण्याचं
आणि आपलं ध्येय पूर्ण करण्याचं
हेच वय आहे चुकण्याचं आणि
झालेल्या चूका सुधारण्याचं

हेच वय आहे जीवनात आलेल्या
अपयशासी संघर्ष करण्याचं
हेच वय आहे आयुष्याच्या वाटेवर
फुल समजून काटे वेचण्याचं

हेच वय आहे उज्वल भविष्य बनवण्याचं
आज लढण्याच आणि उद्या जगण्याच
सामर्थ्य निर्माण करायचं
हेच वय असत...

**शुभम अं. थोटे**
बी.ए. १

# तुझ्यासाठी...

डोळे पुसायला कुणीतरी असेल तर
रुसायला बरं वाटतं
ऐकायला कुणीतरी असेल तर
मनातलं बोलायला बरं वाटतं
कौतुक करणार कुणीतरी असेल तर
थकेपर्यंत राबायला बरं वाटतं
नजर काढणार कुणीतरी असेल तर
नटायला बरं वाटतं
आशेला लावणार कुणीतरी असेल तर
वाट बघायला बरं वाटतं
आपल्यासाठी मरणारं कुणीतरी असेल तर
मरेपर्यंत जगायला बरं वाटतं.

**कु. प्राची आगे**
एम.ए. २ (इतिहास)

# आखिर क्यों ? लड़की की व्यथा

मुलगी असली तरीही
स्वप्न मात्र अनेक आहेत
अनेक दुःखानी वेढलेलं
अस तीचं मन आहे.

